RNI NO. MAHMAR/2020/84035




BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ

मंगळवार, ०६ मे २०२५ | वर्ष : ५ | अंक : १२८ | दैनिक | किंमत : ₹५/-
Tuesday, 06 May 2025 | Year : 5 | Issue : 128 | Daily | Rate: Rs. 5/-

उपलब्ध आहे!
मिस्त्री, टाइल्स फिटर, पेंटर, कारपेंटर, प्लंबर इत्यादीसाठी खालील नंबर वर संपर्क करावा.
संपर्क मो. 8482839451





## मुलांपेक्षा मुली ठरल्या सरस

**रत्नागिरी :** राज्यातील नऊ विभागीय मंडळांमध्ये बारावीच्या परीक्षेत कोकण विभागीय मंडळाने बाजी मारली आहे. कोकण मंडळाने सलग चौदाव्या वर्षी 96.74 टक्के निकालासह राज्यात प्रथम क्रमांक मिळवला आहे. राज्याचा निकाल 91.88 टक्के लागला. एकूण 154 विषयांची परीक्षा माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने राज्यभरात घेतली होती. कोकण बोर्डामुळे कोकणाच्या विद्यार्थ्यांना मोकळा श्वास घेऊन स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व राखता आले. परंतु कोकणातील विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षेकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. परदेशी विद्यापिठाचे आव्हान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या नव्या तंत्रज्ञानाची भाषा अवगत करून नव्या युगाच्या नव्या वाटा दमदारपणे चोखाळल्या पाहिजेत. -ॲड. विलास पाटणे, उपाध्यक्ष, रत्नागिरी एज्युकेशन सोसायटी.

# बारावीच्या परिक्षेत कोकण मंडळ राज्यात सलग 14 वेळा अव्वल

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर कनिष्ठ महाविद्यालयाचा निकाल 98.27 टक्के

### विज्ञान शाखेतून निर्मल कैलास माटे प्रथम




**नागपूर :** महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्यावतीने घेण्यात आलेल्या 12 वीच्या परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला असून यात नागपूर **महापालिकेच्या कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे.** विज्ञान, वाणिज्य व कला या तिन्ही शाखांचा एकत्रित निकाल 93.91 टक्के एवढा लागला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर कनिष्ठ महाविद्यालयाचा निकाल 98.27 टक्के एवढा लागला आहे. **विज्ञान शाखेत डॉ. आंबेडकर कनिष्ठ महाविद्यालयाचा निर्मल कैलास माटे प्रथम आला तर वाणिज्य शाखेत मौलाना अबुल कलाम आझाद विद्यालयाची फिझा मो. रिझवान हाश्मी 71.83 टक्के गुणांसह प्रथम तर कला शाखेत त्याच महाविद्यालयाची मुस्कान फिरदौस हिने 81.83 टक्के मिळवून अव्वल क्रमांक पटकाविला आहे.** महापालिकेच्या कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी संपादन केलेल्या या यशाबद्दल महापालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी आणि अति. आयुक्त वैष्णवी बी व शिक्षणाधिकारी साधना सयाम यांनी महापालिकेच्या कनिष्ठ महाविद्यालयातून उत्तीर्ण झालेल्या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीला शुभेच्छा दिल्या आहेत. बारावीत घवघवीत यश संपादित करीत मनपाच्या महाविद्यालयाचे नावलौकीक करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार मंगळवार 6 मे रोजी सायंकाळी 5 वाजता मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या हस्ते महापालिकेच्या मुख्यालयात होणार आहे.

**विज्ञान शाखा निकाल :**

प्रथम : निर्मल कैलास माटे- 79.67 टक्के गुण - डॉ. बाबासाहेब आंबेडकर कनिष्ठ महाविद्यालय, नागपूर

द्वितीय : नुरमुजस्सम इस्तीयाक खान- 79.50 टक्के गुण- डॉ. बाबासाहेब आंबेडकर कनिष्ठ महाविद्यालय, नागपूर

तृतीय : आयशा फातिम मो. मुजाहिद हुसैन - 74.67 टक्के गुण- एम.ए.के. आझाद उर्दू कनिष्ठ महाविद्यालय

**वाणिज्य शाखा निकाल :**

प्रथम : फिझा मो. रिझवान हाश्मी- 71.83 टक्के गुण - एम.ए.के. आझाद उर्दू कनिष्ठ महाविद्यालय

द्वितीय :- मो. सुफियान अंसारी मो. मुस्ताक - 70.83 टक्के गुण एम.ए.के. आझाद उर्दू कनिष्ठ महाविद्यालय

तृतीय : तमन्ना खान मो. रईस - 64.83 टक्के गुण - ताजाबाद उर्दू कनिष्ठ महाविद्यालय, नागपूर

**कला शाखा निकाल:**

प्रथम : मुस्कान फिरदौस - 81.83 टक्के गुण एम.ए.के. आझाद उर्दू कनिष्ठ महाविद्यालय, नागपूर

द्वितीय : इकरा कौसर- 80 टक्के गुण एम.ए.के. आझाद उर्दू कनिष्ठ महाविद्यालय

तृतीय : अशरिना कौसर - 74 टक्के गुण - एम. ए. के. आझाद उर्दू कनिष्ठ महाविद्यालय

### 100 टक्के निकाल लागलेली महाविद्यालये

**पुणे :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने घेतलेल्या बारावीच्या परीक्षेचा निकाल सोमवारी जाहीर झाला. शंभर टक्के निकाल लागलेल्या महाविद्यालयांची संख्या 1,929 असून, यंदाच्या निकालात शंभर टक्के गुण कोणत्याच विद्यार्थ्याला मिळवता आलेले नाहीत. यंदा 20 हजार 943 विद्यार्थ्यांना स्पोर्ट्स किंवा स्काउट गाइडचे गुणे मिळाले आहेत. तृतीयपंथी 18 विद्यार्थी परीक्षेला बसले होते, अशी माहिती परीक्षा मंडळाने दिली आहे. विद्यार्थ्यांना जेईई, नीट यांसारख्या स्पर्धा परीक्षांची तयारी करण्याकरिता पुरेसा वेळ मिळावा, या दृष्टीने यंदा बारावीची परीक्षा दहा दिवस लवकर घेण्यात आली होती, तसेच कॉपीमुक्त परीक्षा अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली. त्यात विविध उपाययोजना करण्यात आल्या होत्या. सरासरी निकाल कमी लागला असला, तरी मागील वर्षाच्या तुलनेत फार तफावत नाही. - शरद गोसावी, अध्यक्ष, राज्य मंडळ.

### निकालातील विशेष काय?

एकूण विद्यार्थी - 14 लाख 27 हजार 085
परीक्षा दिलेले - 14 लाख 17 हजार 969
उत्तीर्ण झालेले - 13 लाख 2 हजार 873
नोंदणी केलेले पुनर्परीक्षार्थी - 42 हजार 388
परीक्षा दिलेले - 42 हजार 24
उत्तीर्णतेची टक्केवारी - 37.65
नोंदणी केलेले दिव्यांग - 7 हजार 310
परीक्षा दिलेले - 7 हजार 258
उत्तीर्ण - 6 हजार 705 (92.38 टक्के)
नोंदणी केलेले खासगी विद्यार्थी - 36 हजार 133
परीक्षा दिलेले -35 हजार 697
उत्तीर्ण - 29 हजार 892 (83.73 टक्के)
एनसीसी, क्रीडा, स्काउट गाइडसाठी सवलतीचे गुण मिळालेले विद्यार्थी - 20 हजार 943
निकाल राखून ठेवलेले विद्यार्थी - 137
प्रतिबंधित केलेले विद्यार्थी - 130

| अ.क्र. | विभाग | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | कोकण | ९६.७४ |
| २ | कोल्हापूर | ९३.६४ |
| ३ | मुंबई | ९२.९३ |
| ४ | छत्रपती संभाजीनगर | ९२.२४ |
| ५ | अमरावती | ९१.४३ |
| ६ | पुणे | ९१.३२ |
| ७ | नाशिक | ९१.३१ |
| ८ | नागपूर | ९०.६२ |
| ९ | लातूर | ८९.४६ |

## मुंबईच्या निकालात काकणभर वाढ, विभागाचा निकाल 92.93 टक्के

**मुंबई :** राज्य मंडळाने जाहीर केलेल्या बारावीच्या निकालामध्ये मुंबई विभागाने 92.93 टक्क्यांसह तिसरा क्रमांक पटकवला आहे. त्यात मुंबई विभागातील सहा जिल्ह्यांमध्ये रायगड जिल्ह्याने बाजी मारली असून दक्षिण मुंबईचा निकाल सर्वात कमी लागला आहे. तसेच राज्याप्रमाणे मुंबई विभागामध्येही मुली या मुलांपेक्षा सरस ठरल्या आहेत. मुंबई विभागाच्या निकालात रायगड जिल्हा अव्वल ठरला आहे. रायगड जिल्ह्यातील 29 हजार 493 विद्यार्थ्यांपैकी 27 हजार 848 विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, 94.66 टक्के इतका निकाल लागला आहे. त्याखालोखाल ठाण्याचा निकाल 93.74 टक्के लागला असून, ठाण्यातून 96 हजार 89 विद्यार्थ्यांपैकी 89 हजार 827 विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

## सर्वोच्च न्यायालयाचे केंद्र सरकारला खुलासा सादर करण्याचे आदेश...

**नवी दिल्ली :** गेल्या काही दिवसांपासून 4PM News या यूट्यूब चॅनलची चर्चा चालू आहे. केंद्र सरकारने काही दिवसांपूर्वी राष्ट्रीय सुरक्षेचा मुद्दा मांडत हे यूट्यूब चॅनल ब्लॉक केले. मात्र, आपल्याला यूट्यूब चॅनल का ब्लॉक केले याची साधी माहिती देणारी नोटीसही मिळाली नसल्याचा दावा हे चॅनल चालवणारे संजय शर्मा यांनी केला आहे. यासंदर्भात त्यांनी थेट सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली असून त्यावर आज न्यायमूर्ती बी.आर. गवई व न्यायमूर्ती के.व्ही. विश्वनाथन यांच्या खंडपीठासमोर सुनावणी पार पडली. यावेळी न्यायालयाने केंद्र सरकारला आदेश दिले. 4PM Newsयूट्यूब चॅनलवर प्रसारित केला जाणारा मजकूर देशाच्या राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने बाधक असल्याचे सांगत केंद्र सरकारने हे चॅनल ब्लॉक केले. यासंदर्भात दाखल याचिकेवर सोमवारी सुनावणी पार पडली. संजय शर्मा यांच्यावतीने ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी बाजू मांडली.




*'यूट्यूब चॅनल ब्लॉक करण्याआधी साधी नोटीसही पाठवली गेली नाही. संजय शर्मा यांना चॅनल ब्लॉक केल्यासंदर्भात मध्यस्थाकडून समजले. अशा प्रकारची कारवाई ही घटनाबाह्य आहे. यूट्यूब चॅनल ब्लॉक करण्याचे आदेश रद्द करण्यात यावेत, अशी माझ्या अशीलाची मागणी आहे. कोणत्याही कारणाशिवाय हे चॅनल ब्लॉक करण्यात आले आहे', असे कपिल सिब्बल न्यायालयात म्हणाले.* मात्र, न्यायालयाने यावेळी एकतर्फी अंतरिम आदेश पारीत करण्यास नकार दिला. आम्हाला दुसरी बाजूही ऐकून घ्यावी लागेल, असे सांगत न्यायालयाने केंद्र सरकारला यासंदर्भात खुलासा सादर करण्याचे आदेश दिले. कोणत्या तथ्यांच्या आधारे सदर यूट्यूब चॅनल राष्ट्रीय सुरक्षेच्या मुद्द्यावर ब्लॉक करण्यात आले, यासंदर्भात माहिती सादर करण्याचे निर्देश न्यायालयाने यावेळी केंद्राला दिले.

## व्हिएतनाम येथील आंतरराष्ट्रीय वैशाख बुद्धिस्ट परिषदेचे ॲड. सुलेखा कुंभारे यांना विशेष निमंत्रण

### 80 देशातील प्रतिनिधी उपस्थित राहणार



**कामठी :** युनायटेड नेशन डे व वैशाख 2025 या मंगलपर्वावर व्हिएतनाम येथे दि. 6 मे ते 8 मे 2025 या कालावधीत आयोजित आंतरराष्ट्रीय बौद्ध परिषदेकरिता भारतीय प्रतिनिधी म्हणून ॲड. सुलेखा कुंभारे यांना विशेष निमंत्रण म्हणून व्हिएतनाम देशाने निमंत्रित केले आहे. सदर आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये भारतासह जवळपास 80 देशांतील प्रतिष्ठित प्रतिनिधी, बौध्द नेते, विद्वान अभ्यासक, विचारवंत आणि धोरणकर्ते सहभागी होणार आहेत. जगतिक स्तरावरील या परिषदेत मानवी उत्कर्षासाठी बौद्ध तत्वज्ञान, जागतिक शांती, करूणा, मैत्री, एकता, सांप्रदायिक सद्भाव, सामंजस्याचे मार्ग, शाश्वत मानवी भवितव्यासाठी शैक्षणिक सजगता, जागतिक सुसंवाद इत्यादी महत्वाच्या विषयांवर विचारमंथन होणार आहे. सदर आंतरराष्ट्रीय परिषदेत ॲड. सुलेखा कुंभारे या 'मानवी प्रतिष्ठा, एकता, सार्वभौमता, जागतिक शांतता आणि मानवी विकासासाठी बौद्ध अंतर्दृष्टी' या विषयावर मौलिक आणि मूलभूत विवेचन करणार आहेत. सोबतच भारताबरोबरच संपूर्ण जगभरातील बौद्ध धम्मीयांचे श्रद्धास्थान असलेले बुद्धगया येथील महाबोधी महाविहार हे बौद्धांना सोपविण्याच्या संदर्भातील विषयसुद्धा आपण आंतरराष्ट्रीय पटलावर विशेषत्वाने मांडणार असल्याचे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. ॲड. सुलेखा कुंभारे यांनी यापूर्वी अमेरिका येथील न्यूयॉर्क, चिन येथील बिजिंग, जपान येथील हिरोशिमा नागासाकी, थायलंड, म्यानमार, श्रीलंका इत्यादी ठिकाणी आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये सहभाग घेऊन बौद्ध धम्माचे तत्वज्ञान जगभर पसरविण्याचे महनीय कार्य केले आहे. व्हिएतनामतर्फे सदर परिषदेत सहभागी होण्याचा बहुमान त्यांना मिळाला, ही देशासाठी अत्यंत आनंदाची बाब आहे. दि.12 व 13 मे रोजी बौद्धगया येथे ॲड. सुलेखा कुंभारे राहणार उपस्थित.बुद्ध जयंती निमित्त दि. 12 व 13 मे 2025 रोजी बुद्धगया येथील महाबोधी महाविहार येथील विशेष बुद्ध वंदनेत तसेच गेल्या अनेक दिवसांपासुन सुरू असलेल्या महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाच्या सर्मथनात ॲड. सुलेखा कुंभारे उपस्थित राहतील.

## शासकीय अध्यादेश न निघाल्यामुळे अभियांत्रिकी महाविद्यालयाची प्रक्रिया थंड बस्त्यात



**लातूर :** 14 एप्रिल रोजी मंत्रिमंडळाच्या बैठकीत राज्य शासनाने जून 2025 पासून लातूरच्या पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतन मध्ये अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र त्यासंबंधीचा शासकीय अध्यादेश अध्याप न निघाल्यामुळे महाविद्यालय सुरू होण्याची प्रक्रिया थंड बस्त्यात अडकली आहे. 12 फेब्रुवारी 2025 रोजी राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी जूनमध्ये लातूरला शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू केले जाईल असे आश्वासन दिले होते. 50 कोटी रुपये खर्च करून इमारत बांधूनही दोन वर्षापासून ती इमारत धुळखात पडून राहिले असल्याचे वृत्त लोकसत्ताने प्रसिद्ध केले होते त्याची दखल घेऊन आमदार अभिमन्यू पवार व आमदार संजय बनसोडे यांनी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्याकडे यासंबंधी पाठपुरावा केला होता.

## ब्राह्मण महासंघाच्या विरोधानंतर 'फुले' चित्रपटास नागपुरात झुंबड



**नागपूर :** स्त्रियांना शिक्षणाचे द्वार खुले करणारे थोर समाजसेवक महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जीवनावर आधारित हिंदी चित्रपटाला नागपुरात उत्तम प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून येत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षातर्फे महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्यावर आधारित 'फुले' चित्रपटांच्या 'विशेष शो'चे नागपुरातील सदर येथील बुटी (स्मृती)चित्रपटगृहात सोमवारी आयोजन करण्यात आले. ब्राह्मण महासंघाने या चित्रपटास आक्षेप घेतला होता. चित्रपटामुळे पुन्हा जातीय वाद वाढू शकतो, अशी शक्यतादेखील महासंघाने वर्तवली होती. ब्राह्मण रक्षा मंच ही संघटना या चित्रपटाला सर्वाधिक विरोध करत आहे. या चित्रपटात ब्राह्मणांची प्रतिमा मलिन केल्याचा आणि त्यांना चुकीच्या पद्धतीने चित्रित केल्याचा आरोप संघटनेने केला होता. 'फुले' हा चित्रपट महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या समाजसुधारणेच्या संघर्षमय वाटचालीवर आधारित आहे. प्रतीक गांधी यांनी महात्मा फुलेंच्या आणि अभिनेत्री पत्रलेखा यांनी सावित्रीबाई फुलेंची भूमिका केली आहे. महात्मा ज्योतिबा फुले यांनी आपल्या पत्नी सावित्रीबाई फुले यांच्यासह स्त्री शिक्षण, जाति निर्मूलन आणि सामाजिक समतेसाठी झुंज दिली. ब्रिटिशकालीन भारतात त्यांनी मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली. शेतकरी आणि वंचित समाजाच्या हक्कांसाठी लढा दिला. त्यांची प्रेरणादायी कथा आता रूपेरी पडद्यावर आली आहे. विशेष म्हणजे हा चित्रपट केवळ ऐतिहासिक घटनांचा आढावा घेत नाही, तर सामाजिक समतेचा लढा नव्या पिढीसमोर आणणार आहे. काही संघटनांनी फुले चित्रपटातील काही दृष्य आणि संवाद यावर आक्षेप घेतला होता. त्यामुळे हा चित्रपट नियोजित वेळी प्रदर्शित होऊ शकलेला नाही. आता हा चित्रपट प्रदर्शित झाला असून त्यात नेमके काय बदल करण्यात आले आले.

ज्योतिबा फुले यांनी समाजातील अनिष्ठ प्रथा आणि परंपरांविरोधात आवाज उठवला. समाजाला धुडकावून त्यांनी सर्वात आधी आपल्या पत्नी सावित्रीबाई फुले यांना शिकवले. ज्या काळात समाजात बालविवाह, सती जाणे, विधवांचे मुंडन करणे यांसारख्या प्रथा राजरोसपणे सुरू होत्या. ही कथा सुमारे 125 वर्षांपूर्वीची आहे. पत्रलेखा यांनी सावित्रीबाईंचे पात्र साकारले आहे, त्याबद्दल तिचे कौतुक जेवढे करावे तेवढे कमीच आहे. ती तुम्हाला सावित्रीबाई फुलेंसारखी दिसते, एका दृश्यात जेव्हा एक माणूस तिला धमकी देतो की, जर तिने मुलींना शिकवणे थांबवले नाही तर तो तिचा नवरा ज्योतिबा फुले यांना मारेल, तेव्हा पत्रलेखा त्याला एक गोष्ट सांगते आणि त्याला जोरदार चपराक मारते. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे माजी जिल्हा परिषद सदस्य सलील देशमुख यांच्या पुढाकाराने या शोचे आयोजन करण्यात आले.

## निष्ठावंत आंबेडकरी कार्यकर्ता अरुण साखरकर यांचे निधन



**नागपूर :** अरुण साखरकर एक निष्ठावंत आंबेडकरी कार्यकर्ता आपल्या म्हणून निघून गेला अरुण साखर यांचे सामाजिक क्षेत्रामध्ये समाजाच्या प्रत्येक आंदोलनामध्ये प्रत्येकांच्या सुखदुःखामध्ये सहभागी होऊन त्या परिवाराला साथ देण्याचे काम त्यांनी जीवनभर केले.

दोन महिन्यापूर्वी अल्पसा आजार त्यांना जडला त्यामुळे त्यांना श्रीकृष्ण हॉस्पिटलमध्ये त्यांची अँजिओग्राफी करण्यात आली होती. तेव्हापासून त्यांच्या प्रकृतीमध्ये सुधारणा होत नव्हती. अरुण साखरकर यांची आठवण दुःखाच्या वेळेस आवर्जून होते. संपूर्ण प्रेताचे क्रियाक्रम करायचे आणि शेवटपर्यंत सोबत राहत होते. नामांतर चळवळीमध्ये त्यांचा सिंहाचा वाटा होता. एक प्रामाणिक व निष्ठावंत माणूस कुठलीही अपेक्षा न ठेवता फक्त काम करत राहायचे हेच त्यांचे स्वप्न होते. त्यांच्या स्मृतीस दैनिक बहुजन सौरभ व स िव ध ा न परिवाराच्या वतीने श्रद्धांजली व मानाचा सलाम. त्यांच्च मागे 4भाऊ, तिन बहिनीए 1 मुलगा व सून, नात तसेच पत्नी मनिशा पोलिस विभागात कार्यरत आहे. उद्या सकाळी त्यांची सकाळी 11 वाजता उंटखाना त्यांच्या राहत्या घरून निघेल व मोक्षदाम घाटावर अंत्यसंस्कार केले जाईल.

## संरक्षण राज्यमंत्री समकक्ष दर्जाप्राप्त सैन्याधिकारी करणार डी.एससी पदवी प्रदान



**वर्धा :** दीक्षांत सोहळा हा प्रत्येक विद्यार्थ्याच्या जीवनातील सर्वात आनंदाचा क्षण. मान्यवरांच्या हस्ते पदवी, पदक स्वीकारतांना गुणवंतांना लाभणारा आनंद पहावा असाच. सावंगी येथील दत्ता मेघे आयुर्विज्ञान अभिमत विद्यापीठाचा 16 वा दीक्षांत सोहळा 6 मे मंगळवारला विद्यापीठाच्या सभागृहात दुपारी दोन वाजता होणार. याप्रसंगी अदानी फॉउंडेशनच्या डॉ. प्रीती अदानी तसेच भारताच्या सर्जन व्हॉइस अँडमिरल डॉ. आरती सरीन यांची मुख्य उपस्थिती राहणार. दीक्षांत सोहळ्यास प्रमुख पाहुण्या म्हणून लाभलेल्या डॉ. आरती सरीन भारताच्या सर्जन अँडमिरल तथा सशस्त्र दल वैद्यकीय सेवेच्या पहिल्या महिला महासंचालक आहेत. त्यांना संरक्षण राज्यमंत्रीस्तर समकक्ष दर्जा आहे. सशस्त्र दलाच्या इतिहासातील त्या सर्वोच्च दर्जाच्या महिला अधिकारी असून भारतीय नौदलात व्हॉइस अँडमिरल हे पद प्राप्त करणाऱ्या त्या तिसऱ्या महिला ठरल्या. दलाच्या तिन्ही शाखामध्ये सेवा देण्याचा त्यांना दुर्मिळ सन्मान प्राप्त झाला

## भाजप जातीय आणि धर्मांधतेचे विष समाजात कालवत असल्याची काँग्रेस नेत्यांची टीका

**परभणी :** काँग्रेस पक्षाच्या सद्भावना पदयात्रेच्या दुसऱ्या दिवशीही राज्यभरातील महत्त्वाच्या काँग्रेस नेत्यांनी भारतीय जनता पक्षावर जोरदार हल्ला चढवत भारतीय जनता पक्ष देशात व राज्यात जातीय आणि धर्मांधतेचे विष कालवत असल्याची टीका केली. जात जनगणनेच्या मुद्द्यावर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना माघार घ्यावी लागली आणि राहुल गांधी यांच्या मताप्रमाणे निर्णय घ्यावा लागला असेही यावेळी बहुतांश वक्त्यांनी नमूद केले.महाराष्ट्र काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्नीथला यांच्या प्रमुख उपस्थितीत व प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वाखाली आज सोमवारी (दि.5) शहर काँग्रेस कार्यालयापासून संविधान बचाओ पदयात्रा काढण्यात आली. या यात्रेची सांगता अक्षता मंगल कार्यालयात संविधान संमेलनाने झाली. विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार, गोव्याचे प्रभारी माणिकराव ठाकरे, काँग्रेस प्रदेश कार्याध्यक्ष नसीम खान, खा. चंद्रकांत हंडोरे, खा. प्रणिती शिंदे, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव कुणाल चौधरी, यु. बी. व्यंकटेश, खा. डॉ. कल्याण काळे, खा. रविंद्र चव्हाण, प्रदेश उपाध्यक्ष व यात्रेचे समन्वयक मोहन जोशी, परभणी जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सुरेश वरपुडकर, शहराध्यक्ष नदीम इमानदार, बाळासाहेब देशमुख, युवक



अध्यक्ष अमोल जाधव, सुहास पंडित आदी काँग्रेस नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी चेन्नीथला म्हणाले की, सोमनाथ सुर्यवंशी व विजय वाकोडे यांच्यावर झालेल्या अन्यायाप्रश्नी राहुल गांधी यांनी आवाज उठवला, या घटनेला तीन महिने झाले तरी तरी अद्याप सुर्यवंशी यांच्या मारेकऱ्यांवर सरकारने कोणतीच कारवाई केलेली नाही, मुख्यमंत्री यावर काही बोलत नाहीत. राहुल गांधी यांनी सामाजिक न्यायासाठी जातीजनगणनेचा मुद्दा उपस्थित केला.



संत गाडगेबाबा बहुउद्देशीय आश्रम जरूड
बुद्ध विहार समन्वय समिती द्वारा आयोजित
बाल संस्कार एवं व्यक्तिमत्व विकास शिबीर
राष्ट्रीय पालि भाषा प्रशिक्षण शिबीर
रविवार २५ मई से १ जून, २०२५ आठ दिवसीय निवासी शिबीर
शांतीवन चिंचोली (फेटरी) नागपूर (महाराष्ट्र)
बाल संस्कार एवं व्यक्तिमत्व विकास शिबीर (१०० बाल-बालिका, उम्र १३ से १६ साल)
राष्ट्रीय पालि भाषा प्रशिक्षण शिबीर (५० भारत के नागरिक, उम्र १८ से ७० साल, अंग्रेजी, हिंदी, मराठी भाषामें
* पालि भाषा प्रशिक्षक *
आचार्य राजेंद्र भालशंकर (नाशिक)
* मुख्य संयोजक *
सतिश गायकवाड / बबिता गायकवाड
८९९९९६०७९३ / ९९७००८३४३७ / ९६६५६१४३४१
* मुख्य आयोजक *
अशोक सरस्वती बौद्ध / प्रा. डॉ. प्रमिला चिंचखेडे
मो. ८५३०९८०७४१ / ८७८८६०७३२३
आपली नाव नोंदणी करा. (निशुल्क)
अपना नाम दर्ज करने की कृपा करे (निशुल्क)

“ शिक्षण हे सर्वात शक्तिशाली शस्त्र आहे जे आपण जग बदलण्यासाठी वापरू शकतो. - राजर्षी छत्रपती शाहू महाराज ”



## संपादकीय

# लोककल्याणकारी राजा छत्रपती शाहू महाराज !

शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संबंध सर्वश्रुत आहे. डॉ. बाबासाहेब मॅट्रिकमध्ये असताना आणि नंतर कोलंबिया युनिव्हर्सिटीत शिकत असताना त्यांनी डॉ. बाबासाहेबांना स्कॉलरशिप दिली. 20 आणि 21 मार्च 1920 रोजी माणगाव येथे अस्पृश्यता निवारण परिषदेत शाहू महाराजांनी डॉ. बाबासाहेबांच्या कार्याचा गौरव करून कोल्हापूरच्या राजवाड्यात त्यांना जेवणाचे निमंत्रण दिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मूकनायक हे साप्ताहिक सुरू केले पण आर्थिक अडचणीमुळे पुढे ते बंद करावे लागले जेंव्हा हे शाहू महाराजांना समजले तेंव्हा त्यांनी 2500 रुपयांची आर्थिक मदत देऊन हे साप्ताहिक पुन्हा सुरू केले. बहुजन समाजाला मानसिक गुलामीतूम बाहेर काढून, तत्कालीन रूढी परंपरा नाकारुन त्यांनी कोल्हापूर संस्थानामध्ये अनेक सामाजिक सुधारणा केल्या. शाहू महाराजांनी बहुजन समाजामध्ये शिक्षण प्रसार करण्यावर विशेष भर दिला. त्यांनी कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले. शिक्षणाचे महत्व ओळखणारे देशातील पहिले राजे हे छत्रपती शाहू महाराज हेच होते. आज 6 मे, लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची 103 वि पुण्यतिथी. आजच्याच दिवशी 1922 रोजी त्यांचे निधन झाले. 26 जून 1874 रोजी कागल येथील घाटगे घराण्यात त्यांचा जन्म झाला. त्यांच्या वडिलांचे नाव जयसिंगराव तर आईचे नाव राधाबाई असे होते. कोल्हापूर (करवीर) संस्थानचे चौथे शिवाजी महाराज यांच्या मृत्यूनंतर महाराणी आनंदीबाई यांनी कोल्हापूरच्या गादीचे वारसदार म्हणून त्यांना 17 मार्च 1884 रोजी दत्तक घेतले कारण चौथे शिवाजी महाराज यांना मुलबाळ नव्हते. दत्तक घेतल्यावर त्यांचे छत्रपती शाहू महाराज असे नामकरण करण्यात आले. शिक्षण पूर्ण झाल्यावर 2 एप्रिल 1894 रोजी ते कोल्हापूरच्या गादीवर विराजमान झाले. राज्यभिषेक झाल्यावर 1922 पर्यंत म्हणजे 28 वर्ष ते कोल्हापूर संस्थानचे राजे होते. छत्रपती शाहू महाराजांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा आणि विचारांचा वारसा पुढे चालवला. छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवूनच त्यांनी राज्यकारभार केला म्हणूनच ते राजर्षी बनले. ते खऱ्या अर्थाने रयतेचे राजे होते. राज्यातील निरक्षर, गरीब, अस्पृश्य, दलित या बहुजन समाजातील लोकांना शिक्षण दिले तरच त्यांचा सर्वांगीण विकास होईल हे ओळखून त्यांनी समाजातील वंचित, दुर्लक्षित वर्गातील मुलांसाठी वसतिगृहे काढली. विविध जातीधर्मातील मुलांसाठी त्यांनी 22 वसतिगृहे स्थापली त्यात शेकडो मुले शिकली. शिक्षण क्षेत्रात मुलींची संख्या वाढली पाहिजे या हेतूने त्यांनी मुलींना 40 रुपये स्कॉलरशिप सुरू केली. ब्रिटिश सरकार शिक्षणावर वार्षिक 80 हजार रुपये खर्च करत असताना कोल्हापूर संस्थानचा शिक्षणावरील वार्षिक खर्च हा एक लाख रुपये इतका होता. यातच शाहू महाराज यांची शिक्षणाविषयी किती तळमळ होती हे दिसून येते. अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी त्यांनी सुवर्ण व अस्पृश्यांच्या वेगळ्या शाळा भरवण्याची दृष्ट पद्धत रद्द केली. गावच्या पाटलाने कारभार चांगला करावा यासाठी शिक्षण देणाऱ्या पाटील शाळा, तंत्र व कौशल्ये शिकवणाऱ्या शाळा त्यांनी सुरू केल्या. मागासलेल्या लोकांना प्रगतीच्या प्रवाहात आणायचे असेल तर त्यांच्यासाठी राखीव जागांची तरतूद केली पाहिजे हा व्यापक विचार डोळ्यासमोर ठेवून 6 जुलै 1902 रोजी कोल्हापूर संस्थानात मागास जातींना 50 टक्के जागा राखीव ठेवल्या म्हणूनच त्यांना आरक्षणाचे जनक असे म्हणतात. शाहू महाराजांच्या या निर्णयाला तेंव्हा खूप विरोध झाला पण विरोधाला न जुमानता त्यांनी या आरक्षणाची कठोर अंमलबजावणी केली. शाळा, दवाखाने, पाणवठे अशा सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यांशी समतेने वागावे, त्यांच्याशी कोणीही भेदभाव करू नये असा आदेश त्यांनी काढला. 1917 साली विधवा विवाहाला कायदेशीर मान्यता मिळवून दिली. त्यांनी देवादासींची घातक प्रथा बंद केली. बहुजन समाजाला राजकीय प्रवाहात सामावून घेण्यासाठी 1916 साली निपाणी येथे डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. जातिभेदाची प्रथा नष्ट व्हावी म्हणून त्यांनी आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहास कायदेशीर मान्यता दिली. इतकेच नाही तर आपल्या चुलत बहिणीचे लग्न धनगर समाजातील यशवंतराव होळकर यांच्याशी लावून दिले. छत्रपती शाहू महाराजांनी स्पिनिंग अँड व्हीविंग मिल, शाहूपुरी व्यापारपेठ, शेतकऱ्यांच्या सहकारी संस्था, राधानगरी धरणाची उभारणी, शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करुन देणे असे अनेक उपक्रम आपल्या संस्थानात राबवले. त्यांनी शेतीच्या आधुनिकीकरणासाठी संशोधनाला पाठिंबा दिला. नगदी पिके आणि तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्यासाठी किंग एडवर्ड अॅग्रीकल्चर इन्स्टिट्यूटची स्थापना केली. चित्रकला, लोककला, संगीत, साहित्य, नाट्य, कुस्ती या क्षेत्रातील कलावंतांना त्यांनी राजाश्रय मिळवून दिला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा आणि विचारांचा वारसा समर्थपणे पुढे घेऊन जाण्याचे कार्य करणारा एक मानवतावादी राजा म्हणून शाहू महाराजांची इतिहासात नोंद आहे. व्यापक दूरदृष्टीच्या या राजाने त्याकाळी राजेशाही असूनही सामाजिक बंधुभाव, दलित व उपेक्षितांचा उद्धार, शिक्षण, उद्योगधंदे, कला, क्रीडा, आरोग्य या क्षेत्रांमध्ये जे कार्य केले आहे तसे कार्य आजवर कोणीही केले नाही. त्यांचे कार्य आजच्या आणि येणाऱ्या अनेक पिढ्यांसाठी मार्गदर्शक आहे. आज त्यांचा जन्मदिवस सामाजिक न्याय दिन म्हणून साजरा केला जातो ही एकप्रकारे त्यांच्या कार्याला दिलेली मानवंदनाच आहे. ■ ■

बहुजन सौरभ

# छ. शाहू महाराजांविरुद्ध केलेल्या भयंकर कटाची महाराष्ट्रात पुनरावृत्ती

छत्रपती शाहू महाराजांनी शाळा, दवाखाने, पाणवठे, सार्वजनिक विहिरी, सार्वजनिक इमारती इत्यादी ठिकाणी (तत्कालीन) अस्पृश्यांना समानतेने वागवावे असा आदेश कोल्हापूर संस्थानात काढला. 1917 साली त्यांनी पुनर्विवाहाचा कायदा करून विधवा विवाहाला कायदेशीर मान्यता मिळवून दिली. तसेच त्यांनी देवदासी प्रथा बंद करण्यासाठी कायद्याची निर्मिती करून धर्माच्या नावाखाली मंदिरासारख्या पवित्र ठिकाणी होत असलेले स्त्रियांचे लैंगिक शोषण अर्थात वेश्या व्यवसायास बंदी घातली. 24 जुलै 1917 रोजी शाहू महाराजांनी प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करण्यासाठी कायदा केला होता आणि मागासवर्गीयांसाठी त्यांना राहता यावे म्हणून स्वतंत्र वस्तीगृहाची निर्मिती केली. छ. शाहू महाराजांनी स्वातंत्र्यपूर्व काळात 1902 ला आपल्या संस्थानामध्ये अस्पृश्यांसाठी 50टक्के नोकरीमध्ये आरक्षण दिले. त्यामुळे छ.शाहू महाराजांसारखा प्रजाहित दक्ष राजा अन्यत्र झाला नाही. सर्वसामान्यांसाठी केलेल्या या डोंगराएवढ्या विधायक कार्यामुळे शाहू महाराजांना अत्यंत अपमान कारक हाल-अपेष्टा सहन कराव्या लागल्या. पदोपदी त्यांना अपमान सहन करावा लागला. शाहू महाराजांचा राजकीय प्रवास हा सहज साधा आणि सोपा नसून सतत संघर्ष आणि भयंकर षडयंत्राला सामोरे जावे लागले. वेदोक्त प्रकरणाने महाराष्ट्रातले सगळे वातावरण ढवळून निघाले होते. टिळकांच्या केसरी सहित सर्व ब्राम्हणांची मक्तेदारी असलेल्या वृत्तपत्रांनी शाहू महाराजांविरुद्ध जोरदार आग पखड केली. स्वतः लोकमान्य टिळकांनी शाहू महाराज शूद्र असून त्यांना वेदाचा अधिकार नाही अशी भूमिका घेतली. असे असताना अस्पृश्यांसाठी मोफत सक्तीचे शिक्षण, वस्तीगृह निर्मिती, आणि अस्पृषांकरीता नोकऱ्यांमध्ये पन्नास टक्के आरक्षण दिल्यामुळे ब्राम्हणांच्या तळपायातली आग मस्तकात गेली. एका बाजूने त्यांनी विविध वृत्तपत्रातून शाहूंविषयी बदनामीकारक लिखाण केले, तर दुसऱ्या बाजूने छत्रपती शाहूंना हैराण करण्याचे षडयंत्र



सुरू झाले. शाहूंना वेदोक्त प्रकरणात मदत करणाऱ्या ब्राम्हणांना तथाकथित ब्राम्हणांनी धर्म बहिष्कृत केले. त्यांना सार्वजनिक नळावर पाणी भरणे, महालक्ष्मी मंदिरात पूजा करणे, एवढेच नाही तर त्यांच्या अंत्यसंस्कारावर सुद्धा बहिष्कार टाकण्यात आला. 14 सप्टेंबर 1902 रोजी चौथ्या शिवाजीराजांच्या पत्नी मातोश्री आनंदीबाई राणीसाहेब यांचे निधन झाले. त्यांचा अंत्यविधी वेदोक्त पद्धतीने करण्यात येत होता, तर त्याला तेथेच काही ब्राम्हणांनी विरोध केला. त्यावर मोठी वादावादी झाली. अखेर अंत्यसंस्कार वेदोक्त पद्धतीनेच करण्यात आले. त्याचदिवशी मध्यरात्री शाहूंच्या जुन्या राजवाड्याला आग लावण्यात आली. ही आग काही उपद्व्यापी ब्राम्हणांनीच लावली असावी असा महाराजांना संशय होता. या आगीत जुन्या राजवाड्यातील प्रचंड दप्तरखाना खाक झाला. दुसऱ्या दिवशी सकाळी कोल्हापुरातल्या अनेक घरांवर रक्ताची बोटे उमटलेली लोकांनी दिसली. संपूर्ण प्रजेत दैविकोपाची भीती घालण्यात आली. अशाप्रकारे तत्कालीन ब्राम्हणांनी शाहूंना सळोकीपळो करून सोडले. छत्रपती शाहू महाराजांचे कार्य उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे क्रांतिकारी कार्य आहे. त्यामुळे शाहू महाराज जर महानायक असेल तर त्यांना त्रासून हैराण करणारे तात्कालीन ब्राम्हणांना खलनायकच म्हणावे लागेल. आपल्याला माहीतच आहे की महाराष्ट्रामध्ये महाविकास आघाडीचे सरकार असताना उद्धव साहेब ठाकरे हे मुख्यमंत्री होते. कोरोना काळात उद्धव साहेबांनी कुटुंबप्रमुखाच्या नात्याने महाराष्ट्रामध्ये जे नियोजनबद्ध पद्धतीने काम केले. त्याची दखल जागतिक पातळीवर घेण्यात आलेली आहे. परंतु तत्कालीन सरकार हे वसुली सरकार आहे. अशा पद्धतीचा अपप्रचार सत्ताधारी पक्षाचे प्रवक्ते करत होते. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी राज्याचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्या घरी चार ॲफिडेव्हीट घेऊन मिरज येथील समित कदम नावाचा माणूस पाठवला, त्या ॲफिडेव्हीट मध्ये 4 गोष्टी नमूद होत्या. 1) मुख्यमंत्री उद्धवसाहेब ठाकरे यांनी 300 कोटी देशमुखांना वसूल करायला सांगितले. 2) आदित्य ठाकरे यांनी दिशा सालीयन (सुशांतसिंग राजपूतची पीए) वर बलात्कार करून तिला बाल्कनीतून फेकून दिले. 3) अजित पवार यांनी पार्थ पवारच्या उपस्थितीत देशमुखांना घुटका व्यापाऱ्यांकडून पैसे वसूल करायला सांगितले. 4)अनिल परब यांच्यावर काही आरोप. हे चारही कागद अनिल देशमुखांनी ॲफिडेव्हिट करून सही करून द्यावेत. नाहीतर तुरुंगात जावे असा दबाव देवेंद्र फडणवीस यांनी देशमुखांवर आणला.



हेमंत टाले
9975807632

छत्रपती शाहू महाराजांच्या वेदोक्त प्रकरण टिळकांनी सात वर्ष लावून धरले होते. त्यासाठी आपले सगळे प्रयत्न सगळे युक्तिवाद त्यांनी वापरले. अगदी त्याचप्रमाणे अनिल देशमुख यांच्यावरील खोट्या वसुली प्रकरणात देवेंद्र फडणवीस यांनी शर्थीचे प्रयत्न केले. संसदेमध्ये विरोधी पक्ष नेते असताना देवेंद्र फडणवीस या प्रकरणात अतिशय ताकदीने मांडणी करत होते.

जणू काही खरोखरच भयंकर मोठा भ्रष्टाचार महाराष्ट्र झालेला आहे. परंतु शंभर कोटीचा आरोप, एक कोटी 74 लाखाचे आरोपपत्र आणि परमवीर सिंग याने कोर्टात प्रतिज्ञापत्र दिले की या प्रकरणात माझ्याकडे कुठलाही पुरावा नाही. वेदोक्त प्रकरणातून छत्रपती शाहू महाराज सुखरूपपणे बाहेर पडले. कारण तत्कालीन सरकार हे इंग्रजांचे होते. इंग्रजांनी शाहूंच्या बाजूने अर्थात न्यायाच्या बाजूने निर्णय दिला. परंतु अनिल देशमुख या प्रकरणातून सुखरूप बाहेर पडू शकले नाही. कारण ज्या महाखलनायकानी हा कट रचला त्यांच्या मस्तकावर केंद्रातील सर्वोच्च नेतृत्वाचा वरदहस्त होता.

छत्रपती शाहू महाराजांना हैरान करण्यासाठी टिळकांच्या केसरी सहित त्यांच्या अंकित वृत्तपत्रांनी जशी जोरदार बदनामी केली. अगदी त्याचप्रमाणे वरील प्रकरणात गोदी मीडियाने महाविकास आघाडीच्या सरकारला हैराण केले तर आजारी असलेल्या उद्धवसाहेब ठाकरे यांना सळोकीपळो करून सोडले. आज आपण टिळकांची चर्चा करत आहोत. इथून पन्नास वर्षांनी हे भयंकर षडयंत्र रचणाऱ्या महाखलनायकाच्या संदर्भात आपल्या पुढच्या पिढ्या चर्चा करतील की महाराष्ट्राच्या राजकारणात किती भयंकर विषारी माणूस होता की ज्याने सत्ता प्राप्त करण्यासाठी चार दिग्गज नेत्यांना फसवण्याचे कट-कारस्थान केले त्यात एका निष्पाप व्यक्तीला खून आणि बलात्काराच्या खोट्या आरोपात अडकवण्यासाठी आपली सगळी शक्ती पणाला लावली होती. देवेंद्र फडणवीस यांनी रचलेल्या भयंकर कटाबद्दल राष्ट्रसंत तुकडोजी महाराज लिहितात, ‘तेरा नाम लिखा जायेगा! दिन भर झगडा, किसीको रगडा। किसीको मारे चाटा॥ कालबलीकी पुकार आयी। दाल गले नही आटा ॥ तेरा नाम लिखा जायेगा!’ यालाच जोडून राष्ट्रसंत पुढे लिहितात ‘अन्याय होकर बैठे रहना ये महा दुष्कर्म है! न्यायार्थ अपने बंधू को भी दंड देना धर्म है!’ शाहू महाराजांविरुद्ध केलेल्या भयंकर कटकारस्थानाची पुनरावृत्ती पुन्हा आता महाराष्ट्रात होऊ नये. ■ ■

# गरज व समता सैनिक दलाचे महत्व

**मौर्य सम्राट बिंबिसार, चक्रवर्ती सम्राट अशोक, सम्राट कनिष्क, सम्राट प्रसेनजीत, सम्राट बृहद्रथापर्यंत तत्कालीन जंबुद्विपाचा समाज बुद्ध धम्माच्या प्रभावाखाली एकछत्री, एकसंध राज्य होते. समाज शिक्षित, सुखी, समृद्ध, संपन्न, समाधानी होता. देशात स्वातंत्र्य उत्खननात संपूर्ण जंबुद्विपात म्हणजे प्राचीन भारतात ठिकठिकाणी सापडतो. जिथे कुठे खोदकाम केले की बुद्ध प्रतिमा, बुद्धधम्म प्रसाराचे अनेक पुरावे आढळतात. त्यांचे हिंदूकरण करणाऱ्यांना थोडी तर वाटावी? पण नाही. ‘आयत्या बिळावर नागोबा.’ चमत्कार, अंधश्रद्धा, धर्मांधतेला वाव नव्हता. आपसी वैर, हेवेदावे, वैमनस्य नव्हते.**

बुद्ध धम्मामुळे देशात समता नांदत होती. सामाजिक ऐक्य प्रबळ होते. समाजात, वर्णभेद, जातीभेद नव्हते. द्वेशमुलक भावनेला, द्वेशमुलक विचारांना थारा नव्हता. समाजात समानता, शांतता, स्वावलंबन होते. अहिंसा पाळली जायची. समाजात लबाडी, फसवणूक नव्हती. ‘जगा व जगू द्या’ या बुद्धाच्या कल्याणकारी तत्वज्ञानाने व विचारधारेने देश सुजलाम, सुफलाम होते. जंबुद्विप शांत, वैभव संपन्न समृद्ध होते. याला कारण ठरले बुद्धाचे विज्ञानवादी, परिवर्तनवादी सर्वसमावेशक तत्वज्ञान. यामुळे ब्राम्हणवादी संस्कार अज्ञान, कर्मकांड, दगाफटका, फसवणूक, धर्मांधता, परावलंबन, नवस, समाजातून बाद झाले. वैदिक धर्माचे कर्मकांड, ब्राम्हणी धर्माचे कर्मकांड समाज संस्कृतीतून वजा झाले. बुद्धाने समाजातून कर्मकांड काढले. माणसाला माणूस असल्याची, तो आश्रित नसल्याची ओळख दिली ‘अत्त दिप भव’ हा सर्व कालीन मंत्र दिला. समाज स्वावलंबी केला. जंबुद्विपात आगंतुक युरेशियन ब्राम्हण समाज बुद्धिमान चलाख होता व आहे. हा समाज ऐतखाऊ स्वसवयीचा, अधिकार गाजवण्याच्या स्वसवयीचा गुलाम आहे. बुद्धाच्या मानवतावादी उपदेशाचा ब्राम्हणेत्तर समाजावर अनुकूल तर काही मोजक्या ब्राम्हण समाजावर प्रतिकूल परिणाम झाला. बुद्धाचे मानव कल्याणाचे सिद्धांत सर्वांसाठी समान व पोषक होते व आहेत. ब्राम्हण वाद्यांना ब्राम्हणेतर समाजाने ब्राम्हणांसोबत यावे, समान दर्जाचे सोबत राहावे ही धारणा तेंव्हाही मान्य नव्हती आजही नाही. त्यांनी कट रचला. त्यानुसार ब्राम्हण सेनापती पुष्यमित्त शुंगाने कपटाने सम्राट बृहद्रथाचा वध केला. राज्यावर कब्जा केला. समाजात ब्राम्हणवाद्यांनी ऊंच-नीच; वरिष्ठ -कनिष्ट संस्काराचे बीज पेरले. याची भूरळ अनेक ब्राम्हणेतरांना लागली. गुलाम असलो? तरी कनिष्ठांपेक्षा वरिष्ट आहोत ही भावना रुजली. ते खूश झाले. या विचाराने प्रभावित होऊन समाज पोखरला गेला. समाजात तट, गट पडले. ब्राम्हणवादी वर्चस्व वाढले. स्वार्थांध होऊन याचा गैरफायदा घेतला. भुताटकीच्या, स्वर्ग-नरकाच्या, आत्मा-परमात्माच्या, ईश्वर-परमेश्वराच्या, जादू-टोन्याच्या भीतीचे सावट वाढणाऱ्या मनोरंजक कथा, कादंबऱ्या लिहिल्या. त्यांना धर्मग्रंथ केले. कपोलकल्पित पात्र, नेतृत्व निर्माण केले. ब्राम्हणेतर समाज गुंतून राहण्यासाठी याची पुनरावृत्ती करीत राहिले. खोटे पण रेटून बोलून दुसऱ्याची फसवणूक करणे यात त्यांचे महारथ, कौशल्य आहे. तत्कालिन 30 कोटी समाजाच्या सुरक्षेसाठी त्यांनी 33 कोटी देवी देवतांची निर्मिती करून ब्राम्हणेतर समाजाच्या पुढ्यात टाकले. त्यातून चतुराईने 10 संखेच्या आंत ईश्वर-परमेश्वर केले. या सर्वांचा प्रत्यक्ष संबंध ब्राम्हणांशी म्हणजे




स्वतःशी जोडला. याचा अर्थ ब्राम्हण म्हणजे प्रती परमेश्वर. याची आराधना केल्याने संकट दूर करण्याचा उपाय सांगितला; पूजाअर्चा. तिही ब्राम्हणांकडूनच. त्यासाठी मानधन, किंमती ड्रायफ्रूट, साजूक तूप, भटांनी सांगितली तेवढी दान दक्षिणा आलीच. ईश्वर-परमेश्वर स्मरणासाठी वर्षाला हिंदू सण शेकडो ईश्वर परमेश्वराला खुश ठेवण्यासाठी जवळपास सर्व सणांना ब्राम्हणांकडूनच पूजापाठ करणे हा सुरक्षा कवच असल्याचे वारंवार पटवून दिले. भोळी जनता फसली. देशातील 80टक्के जनता कामगार, कष्टकरी, शेतकरी आहे. कमावले ते देवांना खूश करण्यात सण त्योहारात गमावले. उरले काही नाही. अशी नेहमीच अवस्था झाली व होते. हजारो वर्षे प्रतारणा, मागे गुलामी लागली. यातून निघण्याचा मार्ग नाही. ‘पटानेवाला चाहिये कई बेवकूफ मिलते है’अशी भारतीयांची अवस्था आहे. वस्तुतः ब्राम्हणांना अथवा त्यांनी निर्माण केलेल्या देवी देवतांना त्यांचे समोर 10 फुटांवर भाजलेला पापड ठेवला तर त्या कोणालाही तोडता येत नाही. ही वस्तुस्थिती असली तरी ‘खोटे पण रेटून बोलणे’ याचे शक्ती प्रदर्शन करतात.

## विद्या व्यासंग



प्राचार्य भाऊ वासनिक
मो. 9423606064

ब्राम्हणांनी निर्माण केलेले देवीदेवता, ईश्वर परमेश्वर स्वतः मानत नाही. पूर्ण ब्राम्हण समाज ब्राम्हणवादी नाही. पण मिळणारा गैरफायदा का टाळावा असे इतरांचे झाले. स्वार्थासाठी ब्राम्हणवाद्यांनी स्वतःची बुद्धी भ्रष्ट केली, आपल्यासारखे बुद्धीमान दुसरे होऊ शकतात, राहू शकतात हे त्यांना मान्य नाही. अज्ञानवश ब्राम्हणेतरही हेच स्विकारतात. म्हणून 3.5 टक्के ते 4 टक्के असणारा ब्राम्हण समाज 96टक्के 97.5 टक्के असणाऱ्या ब्राम्हणेतर समाजावर हुकूम गाजवतो.

शासन, प्रशासनात या समाजाने अघोषित, 100×100/4=2500 टक्के आरक्षणाचा लाभ घेतला व घेत आहे. हे खुले गणित समजू नये यासाठी ब्राम्हणेतर समाज 4 वर्ण व हजारो जातीत विभागला. जातीवाद वाढवला. काहींना जनावराहून नीच श्रेणी दिली. यांचे पडसाद उमटले. भारतीय समाज विखुरला. ब्राम्हण समाज जातीत विभागला नाही. ब्राम्हण समाज बुद्धिमान आहे. पण स्वबळावर देशासाठी, देशाच्या जनतेसाठी चांगले केले असे उदाहरण नाही. देशाच्या सुरक्षेसाठी काही नाविण्यपूर्ण केले असे नाही. उलट त्याच्या दुष्टबुद्धी व्यवहाराने देश पारतंत्र्यात गेले. देशाने गुलामी अनुभवली. खर तर असे करणारे ते देशाचे अपराधी, शत्रू आणि संविधानीक कलमानुसार देशद्रोही आहेत. म्हणून त्यांनी संविधान बदलण्याचा कट रचला.

असंभव ते संभव करण्याच्या प्रयत्नात आहेत; जे त्यांना ‘घरका न घाटका’ करेल. हे त्यांनी अधोरेखीत करून ठेवावे. ब्राम्हणांची दलाली करणारे काही उपटसूंग जुने खड्डे कशाला खोदता असा युक्तीवाद करतात. प. पू. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हे खोदले नसते तर आपला, देशाचा, ब्राम्हणांचा इतिहास समजला नसता. हजार वर्षांपूर्वी होतो तसे राहिलो असतो. बोटावर मोजल्या जाणाऱ्या संख्येत जगातील बुद्धीमान, विद्वान असतांना डॉ. बाबासाहेब स्वदेशात अस्पृश्य ठरले. ओंजळीने पाणी प्यायचे. परिचर टेबलावर फाईल फेकायचा. त्यांनी समाजावर होणारा अत्याचार अनुभवला. उदय अचानक, चमत्काराने होत नाही. ज्याच्यात हिम्मत, कामाची जिद्द, पक्का नीर्धार असतो तोच संसार प्रकाशित करतो. डॉ. बाबासाहेबांनी स्वाभिमानाची ज्योत सतत तेवत ठेवण्यासाठी समाजापुढे मांडलेल्या प्रयोगापैकी ‘समता सैनिक दल’ हा एक प्रयोग आहे. पीडित समाजाला हजारो वर्षांच्या अत्याचारातून, गुलामीतून मुक्त करण्यासाठी एकाच वेळेस सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक असे अनेक मोर्चे सुरू केले. जन जागरणासाठी वृत्तपत्रे सुरू केली. भारतीय हिंदू समाज त्यांना, समजण्यात कमी पडला. त्याच्या कार्याला समजू शकला नाही. उलट त्यांचेवर हमले केले. ते सारे विसरून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समाजाची बांधुनी सुरू केली. राजकीय हक्कासाठी मजूर पक्ष, शेड्युल कास्ट फेडरेशन, रिपब्लिकन पक्ष निर्माण केले. समाज शिक्षित करण्यासाठी पिपल्स एज्युकेशन सोसायटी अंतर्गत मुंबई, औरंगाबाद महाडला शाळा महाविद्यालये उघडली. हिंदू धर्मातील चुकीच्या समजूती दूर करण्यास हिंदू श्रेष्ठी तयार नसल्याने नाईलाजास्तव डॉ. बाबासाहेबांनी धर्मांतराची घोषणा केली. पण महाड, नाशिकच्या संग्रामापासून स्पृश्यांनी शहरात, खेड्यात अस्पृश्यावर हमले केले. अत्याचार, दुराचार सुरू केला. जाळपोळ केली. पुरूष स्त्रीयासह अस्पृश्यांची घरे जाळली महिलांवर अत्याचार केला. आगजणी केली. क्रमशः ■ ■

# भारताचे संविधान आणि टीकाकार

डॉ. ‘भारताच्या राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. आंबेडकर नसून त्यांची घटना परिषदेतील खरी भूमिका वृतांत लेखकाची होती,’ असे एका मूर्ख असलेल्या अरुण शौरी या हिंदुत्ववादी पत्रकाराने व्यक्त केली होती. शौरींचे हे मत अभ्यासातून तयार झालेले नसून आंबेडकर आणि दलित चळवळीबद्दलच्या द्वेषातून निर्माण झालेले आहे. भारताच्या राज्यघटनेच्या निर्मितीचे श्रेय डॉ. आंबेडकरांना खुद्द घटना परिषदेनेच दिलेले होते. स्वतः आंबेडकरांनी ते श्रेय सर्वस्वी आपल्याकडे न घेता ते अनेकांना वाटून दिले होते. भारताच्या घटना परिषदेने निवडलेला मार्ग हा व्यक्तीला प्रमुख घटक मानणारा, प्रौढ मताधिकारावर उभी असलेल्या संसदीय लोकशाहीचा पुरस्कार करणारा, भारताला सामाजिक क्रांतीसाठी आधुनिक राज्य बनविणारा, भारत एकात्म ठेवण्यासाठी लोकशाही केंद्रीकरणाच्या मार्गाने नेणारा, धार्मिक मुलतत्ववाद दूर सारण्यासाठी धर्मनिरपेक्षतेचा पुरस्कार करणारा आणि औद्योगिक अर्थव्यवस्थेवर उभा असलेला; परंतु आर्थिक समतेसाठी समाजवादाचा पुरस्कार करणारा मार्ग होता. हा मार्ग जसा गांधीवाद्यांना मान्य नव्हता तसाच हिंदुत्ववाद्यांना मान्य नव्हता. त्याला जसा भांडवलदारांचा विरोध होता, तसाच मार्क्सवाद्यांचाही विरोध होता. अलीकडे तो विरोध विशेषत; हिंदुत्ववादी गटात जास्त जोरात उफाळून येताना दिसतो. या दृष्टीने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रमुख विचारवंत दत्तोपंत ठेंगडी यांनी या राज्यघटनेला पर्याय देणारी मांडणी या दशकभरात सातत्याने केली आहे. तिचा विचार करण्यापूर्वी त्यांचा या राज्यघटनेला एवढा कडाडून विरोध का आहे, याचाही विचार करावा लागेल. प्रौढ मताधिकार आणि संसदीय लोकशाही या आपल्या प्राचीन संस्कृतीशी विसंगत असल्यामुळे त्या त्याज्य आहेत, असे त्यांचे मत आहे. घटना समितीच्या बाहेर या राज्यघटनेचे प्रमुख टीकाकार मा. स. गोळवलकर गुरुजी होते. त्यांनी राज्य घटनेसंबंधी म्हटले आहे की, ‘आपली राज्यघटना ही पाश्चात्य देशातील वेगवेगळ्या राज्य घटनांमधील थोडी थोडी कलमे जोडून तयार केलेली एक बेजोड राज्यघटना आहे. आपले म्हणावे तसे या राज्य घटनेत काहीच नाही. आपल्या राष्ट्र जीवनाचे उद्दिष्ट काय आहे, आपल्या जीवनाचे मूलाधार तत्व कोणते आहे, यासंबंधी राज्यघटनेच्या मार्गदर्शक तत्वात एका अक्षराने तरी उल्लेख आहे काय? सयुंक्त राष्ट्राच्या किंवा लीग ऑफ नेशनच्या घोषणा पत्रातील काही ठिसूळ सिद्धांत आणि अमेरिकेच्या व ब्रिटीशांच्या राज्यघटनेतील काही तुकडे एकत्रित करून त्यांची एक गोधडी तयार करण्यात आली आहे.’ (मा.स.गोळवलकर विचारधन, पृष्ठ 204) श्री. दत्तोपंत ठेंगडी यांनी तिसरा पर्याय (Third way) या नावाचा ग्रंथ 1995 च्या मे महिन्यात प्रसिद्ध केला. भांडवलशाही आणि साम्यवाद या दोन परस्परविरुद्ध विचारसरणीना पर्याय सांगणारे लिखाण त्यांच्या ग्रंथापूर्वी जवळजवळ एक दशक सातत्याने प्रसिद्ध होत होते. या दृष्टीने 1995 नंतरही बरेच लिखाण प्रसिद्ध झाले आहे. दत्तोपंतांनी त्यासंबंधी काही लिहिले असते तर फार बरे झाले असते. त्यांच्या ग्रंथात या लिखाणाचे संदर्भ नसल्यामुळे या विषयावरील जागतिक स्तरावरील चर्चा किती पुढे गेली आहे, हे वाचकांना समजण्याची शक्यता नाही. ( संदर्भ :- डॉ. रावसाहेब कसबे - डॉ. आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना) दत्तोपंत ठेंगडी यांच्या ‘तिसरा पर्याय’ या ग्रंथात भारतीय राज्यघटनेबद्दल ‘देशी संविधानात्मक व्यवस्थेकडे’ या नावाचे प्रकरण आहे. त्याने या ग्रंथाची पृ. 192 ते 279 म्हणजे जवळजवळ एक्क्यांशी पृष्ठे व्यापलेली आहेत. भारतीय संविधान निर्मितीपासूनच हिंदुत्ववादी विचारवंतांच्या टीकेचा विषय बनलेले आहे. त्यांची भारताच्या घटनेवर दोन प्रकारची टीका आहे. पहिल्या प्रकारात आमच्या बहुतांश सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि उर्वरित सांस्कृतिक समस्यांची मुळे स्वतंत्र भारताच्या संविधानात्मक संकल्पनेवर व रचनेवर पश्चिमी नीतीचा आकृतीबंधाचा जो जबरदस्त प्रभाव आहे, त्यात आहेत. दुसऱ्या प्रकारत ‘भारतीय राज्यघटनेत भारताच्या प्राचीन सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक वारशाचे अजिबात प्रतिबिंब नसल्यामुळे ही राज्यघटना बदलली पाहिजे. त्यासाठी नवी घटना समिती गठीत केली पाहिजे.’ श्री. दत्तोपंत ठेंगडी यांनी भारताच्या राज्यघटनेवर टीका करताना जे संदर्भ वापरले आहेत, त्यावरून त्यांच्या या विषयावरील व्यासंगाची सहज कल्पना येते. Third way या त्यांच्या ग्रंथातील या प्रकरणाचे वैशिष्ट्ये असे आहे की, दत्तोपंतांनी केवळ भारताच्या राज्यघटनेवर टीका केली नाही तर त्यांच्या मनातील राज्यघटनेचे प्रारूप ठोस शब्दात मांडले आहे. त्यामुळेच हे प्रकरण त्यांच्या इतर लेखनापेक्षा वैशिष्ट्यपूर्ण बनलेले आहे. सध्याची राज्यघटना त्वरित बदलली पाहिजे; आपले राष्ट्रीय मानस आणि बाह्य जगातील आधुनिक प्रवाह लक्षात घेवून विलंब न करता नव्या घटनेचा आराखडा तयार करण्याची आवश्यकता आहे, या निर्णयापर्यंत श्री. दत्तोपंत ठेंगडी आलेले आहेत.



हरिश्चंद्र लाडे
मो. 9421781190

श्री. दत्तोपंत ठेंगडी यांनी पुढे केलेला हिंदुत्ववादी तिसरा पर्याय (Third way) अखिल जगाला सोडाच परंतु भारतालासुद्धा फारसा लाभदायक ठरेल असे दिसत नाही. कारण त्यात इसवी सन पूर्व प्राचीन समाजाचाच विचार अधिक आहे; त्यात आधुनिक माणसाचा विचारच दिसत नाही. प्राचीन समाजातील जूना माणूस ‘गर्दीतील एक’ होता. तो कुल, गण, जात, धर्म, किंवा वर्ण यांच्याच नावाने ओळखला जात होता. त्याला स्वतःची स्वतंत्र ओळखच नव्हती. त्याने राजा, धर्म, वंश, जात आणि वर्ण यांच्यासाठी स्वत्वाला तिलांजली दिली होती. तो स्वतःच्या श्रमावरील हक्क गमावून बसला होता. प्राचीन काळातील स्त्री पुरुषांनी फार सहन केले आहे. त्यातही स्त्रियांनी अधिक. जुन्या माणसाना जगातील सर्वच धर्मांनी (बौद्ध धर्म अपवाद) अनेक आश्वासने दिलीत. त्यांच्या पूर्तीसाठी त्याना दुःख आणि आत्मक्लेश भोगण्याची शिकवण दिली. ते भोगीत असताना भविष्यातील स्वप्ने बघण्याशिवाय त्यांच्या हातात काहीच नव्हते. परंतु त्यांची स्वप्ने आणि धर्मांनी दिलेली आश्वासने वास्तवात कधीच उतरली नाहीत. पण गेल्या चारशे पाचशे वर्षातील वैज्ञानिक आणि तंत्रज्ञानातील झालेल्या प्रगतीने त्यांचे श्रम कमी केले. भांडवलशाहीच्या उदयाने त्याला व्यक्ती (individual) बनण्यास मदत केली. तिथून पुढे मात्र तो विद्रोही बनला होता. त्या सर्व गोष्टींविरुद्ध त्याने बंड पुकारले. त्याने राजेशाही नष्ट केली. वंशवादाविरुद्ध संघर्ष केला. वर्ण, जाती आणि स्त्रीदास्य-अंताचे लढे निकराने लढविले. धर्माला व्यक्तिगत पातळीवर आणले आणि देशाला अखिल जगाशी जोडले. त्याच्या दृष्टीने आता ‘जुने ते सोने’ राहिले नाही. त्याने जुन्यातील माणूस बनण्यासाठी अर्जित केलेल्या गोष्टींचा वारसा प्राणपणाने जपून ठेवला आणि अधिक नवे रूप धारण करण्यासाठी तो अधिकाधिक कौशल्य अर्जित करण्यात मग्न झाला. त्याला त्याच्या निर्मितीक्षमतेचे आणि तिच्यातून निर्माण होणाऱ्या बाह्य व आंतरिक समृद्धीचे आता भान आले आहे. त्याने भूतकाळाला नाकारण्याची जबाबदारी धैर्याने स्वीकारली आहे. त्यामुळे त्याला प्राचीन काळच्या भूतकाळात परत फिरण्याची इच्छा नाही. त्याला राजा, धर्म, देश, जाती आणि वर्ण यांची गुलामी पुन्हा स्वीकारण्याची इच्छा नाही. तो पूर्ण स्वतंत्र होवू पाहत आहे. त्यामुळेच त्याला काही काळ उदासी आणि असहायतेच्या भावनेने ग्रासले जाण्याची शक्यता आहे. परंतु त्याच्या या कमजोरीचा चलाखीने फायदा घेवून त्याला इतिहासातील सुरक्षिततेचे आमिष दाखविण्याचा खेळ जबाबदार माणसे खेळत नसतात; त्याला अधिक पुढे जाण्यासाठी बळ पुरवणे ही जबाबदार माणसांची जबाबदारी असते. भारत आज जगाचा एक अविभाज्य भाग बनल्यामुळे त्यालाही त्याच इच्छित स्थळी पोहचावे लागेल. सध्या अस्तित्वात असलेल्या भारताच्या राज्यघटनेची मूळ चौकट या दिशेने पुढे नेण्यास मदत करणारी असल्यामुळे तिचे संरक्षण करणे, हे प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य आहे. ■ ■

बहुजन सौरभ

## वाचकांचे विचारपिठ

बहुजन सौरभ

# भारतीय संविधान सर्वोच्च रामदास आठवलेंची पोपटपंची सोडावी

देशातील लोकशाही, संसद, विधीमंडळे हे संविधानातील कलमांच्या तरतुदीनुसार चालत असतात. संविधानातील अनुच्छेद 124 ते कलम 147नुसार कायदा किंवा विधी मंडळाने केलेला ठराव कायदा पारित झाला तरी आर्टिकल 147 नुसार त्याचा गर्भात अर्थ संविधानाच्या अर्थाचा अनर्थ करीत असेल त्याची चाचपणी करण्याचा अधिकार संविधानाने सर्वोच्च न्यायालयाला बहाल केला आहे. हे साधे ज्ञान गेल्या 33 वर्षापासुन सत्तेचे फळ चाखणाऱ्या रामदास आठवले उर्फ रामा फुसाटयाला अवगत नाही, ही केवलवाणी बाब असून त्यांचा मोदी साहेबांचा पोपटपंची मुळे उरली सुरली पत समाजात राहिली नाही. सन 1977 च्या मे महिन्याच्या फुटीनंतर ज्येष्ठ कार्यकर्ते गंगाधर गाडे यांच्या सानिध्यामुळे झोळीतील नेता शरद पवारांच्या कृपेने समाज कल्याण मंत्री सन 1992 ला झाले. नंतर कॉंग्रेस चा वरदहस्तामुळे त्याचे 6 आमदार व 4 कार्यकर्ते मंत्री बनलेत.

सन 2014 पासून मोदी साहेबांचे शब्द सुमनाने गुनगान करीत असतांना भुपेश थुलकर सारख्या ज्येष्ठ विश्वासू सहकाऱ्याला ते साधे आमदार भाजपाच्या कृपेने बनवु शकले नाही ही आठवलेची शोकांतिका आहे. आंबेडकरी समाज राजकीय, सामाजिक, आर्थिक व भावनिक प्रश्नांनी ग्रस्त आहे. विश्वास ठेवणारा नेता समाजात राहिला नाही. भारतातील नव्हे तर जगातील बौध्दांचा जागतिक प्रश्न झालेला ‘महाबोधी महाविहार बुध्दगया’ च्या प्रश्नाने पेट घेतला आहे. अशा वेळेस सत्तेला लाथ मारून रामदास ने जनतेसोबत रस्त्यावर यावे. ■ ■

- ॲड. सुरेशचंद्र घाटे

“ शिक्षण म्हणजे केवळ ज्ञान मिळविणे नव्हे, तर ते गंभीर आणि सर्जनशीलपणे विचार करण्याची क्षमता विकसित करणे होय. ”



# एक आक्रमक पॅन्थर - विनोद भालेराव

*11 जुलै 1997 रोजीची पहाट मुंबईतील घाटकोपर परिसरातील रमाबाई आंबेडकर नगर येथे अत्यंत दुःखद आणि संतापजनक घटना घडली. या घटनेने संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ उडवून दिली आणि त्या घटनेने दलितांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला. ही एक दुदैवी घटना होती.*

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा विटंबनाची. तेथील रहिवासीयांनी ते बघताच संतप्त समाज रस्त्यावर उतरून रस्ता रोको व निदर्शने करू लागला. या निषेधाला उत्तर म्हणून पोलीसांनी गोळीबार केला, ज्यात 10 दलित नागरिक जागीच ठार झाले आणि 26 हून अधिक जखमी झाले. गोळीबार करणारा पोलीस अधिकारी मनोहर कदम होता, जो SRPF (State Reserve Police Force) पथकात अधिकारी म्हणून कार्यरत होता. प्रकरण चिघळल्याने संपूर्ण राज्यात दलित समाजात संतापाची लाट उसळली. मुंबईसह अनेक भागांत रास्ता रोको, निदर्शने, मोर्चे काढण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अनुयायी आणि विविध दलित संघटनांनी न्यायाची मागणी केली. रिपब्लिकन पक्ष, भारिप बहुजन महासंघ, दलित पँथर या पक्षांनी सरकारवर दबाव आणण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे मनोहर कदम या पोलीस अधिकाऱ्यावर गुन्हा दाखल करण्यात आला.

2009 मध्ये विशेष न्यायालयाने त्याला दोषी ठरवून आजीवन कारावासाची शिक्षा सुनावली. मात्र 2011 मध्ये मुंबई उच्च न्यायालयाने ती शिक्षा रद्द केली आणि त्याला निर्दोष मुक्त करण्यात आले. यामुळे दलित समाजात आणखी रोष निर्माण झाला आणि न्यायसंस्थेवर अविश्वासाची भावना वाढली. रमाबाई आंबेडकर नगर विटंबना प्रकरण ही केवळ एक पोलिसी चूक नव्हती, तर दलित समाजाच्या अस्मितेवर झालेला घाव होता. या घटनेमुळे दलितांमधील संघटनात्मक शक्ती पुन्हा एकदा जागी झाली आणि सामाजिक न्यायासाठीचा संघर्ष अधिक तीव्र झाला.

1997 मधील रमाबाई आंबेडकर नगर गोळीबार प्रकरणानंतर अमरावती जिल्ह्यातील दलित पँथर्सच्या कार्यकर्त्यांनी तीव्र प्रतिक्रिया दिली होती. संपूर्ण अमरावती शहर, आजूबाजूचे खेडे गाव, नया अकोला, वलगाव, परतवाडा, चांदूर बाजार, अंजनगाव, चांदुर रेल्वे, मोर्शी, दर्यापूर या तालुक्यांतून दलित पँथर्स व आंबेडकरी कार्यकर्त्यांनी निषेध मोर्चे काढले.

'पुतळ्याचा अवमान सहन करणार नाही. गोळीबार करणाऱ्यांना शिक्षा झालीच पाहिजे!' अशा घोषणा देत मा. अनिल गोंडाने यांच्या नेतृत्वात प्रचंड जन आंदोलन झाले. बंद पुकारण्यात आले. दलित संघटनांनी बाजारपेठा, शाळा बंद ठेवण्यासाठी आवाहन केले. अमरावतीत स्वतःहून अनेक व्यापाऱ्यांनी दुकाने बंद ठेवली हे विशेष. अमरावती मधील दलित पँथर्सचे कार्यकर्ते, विशेषतः वकील, शिक्षक, साहित्यिक यांनी सभांमध्ये भाषणे देत ही घटना 'दलितांचा हक्क नाकारणारी आणि सत्तेच्या बळाने दडपून टाकणारी' असल्याचे सांगितले जात होते. 'हे डॉ. बाबासाहेबांच्या पुतळ्यावर नाही, तर त्यांच्या विचारांवर गोळीबार आहे.' अशा गर्जना वेगवेगळ्या सभामधून ऐकायला मिळत होत्या. शहरातील शासकीय कॉलेज, वसतिगृहांमधून विद्यार्थी रस्त्यावर उतरले. जिल्ह्यातील विदर्भातील आंबेडकरी विद्यार्थ्यांमध्ये संतापाची लाट पसरली. अमरावती ही आंबेडकरी चळवळीचे मुख्य केंद्र असल्यामुळे, येथील पँथर्स कार्यकर्ते सतत सजग होते. रमाबाई आंबेडकर गोळीबार प्रकरणाचा हा लढा केवळ मुंबईपुरता मर्यादित न ठेवता, ग्रामीण विदर्भातही उठाव केला. शहराच्या राष्ट्रीय महामार्गवरील वाहने आंदोलन कर्त्याकडून जाळण्यात आली. शहराच्या मध्यवस्तितील इर्वीन चौकात कार्यकर्त्यांची निदर्शने चालू होती. जिल्ह्यातील शेकडो पॅन्थर्स जमावबंदीचा आदेश धुडकावीत पोलिसासमोर निदर्शने करून निषेध व्यक्त करू लागली. अशातच पोलिसांचा लाठीचार्ज सुरु झाला. यामध्ये कठोरा बु. येथील पँथर विनोद भाऊ भालेराव यांनी आक्रमकता दाखवली. तेव्हा एकट्या पँथर वर अनेक शिपाई तुटून पडले. एकट्या विनोदभाऊने बराच प्रतिकार केला परंतु ते खाली कोसळले.



रवींद्र दांडगे
94045 45238

रक्त बांबळ अवस्थेत विनोद भालेराव कोसळले. तेव्हा लगेच पोलीस अधिकारी पी. टी. पाटील यांनी ॲम्ब्युलन्स बोलावून जखमी अवस्थेत नागपूरला हलविले.

त्यावेळी समाधान वानखडे, साहेबराव गुळसुंदरे हे कार्यकर्ते प्रामुख्याने सोबत होते. प्रचंड रक्तस्त्रावामुळे विनोद भालेराव यांची तब्येत बिघडली होती. पोलीस अधिकारी पी. टी. पाटील यांच्या दक्षतेने व चतुराईमुळे विनोद भालेराव यांचे प्राण वाचले. आज या आक्रमक पँथरचा वाढदिवस असून कठोरा येथील ग्रामस्थ व आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांनी सायंकाळी 7 वाजता त्यांचा अभिष्ट चिंतन सोहळा साजरा करण्याचे ठरविले आहे.





विनोद भालेराव हे अमरावती जिल्ह्यातील आंबेडकरी चळवळीतील शीर्ष नेते आहेत. सन 1984 पासून ते आजपर्यंत त्यांनी कठोरा बु. ग्रामपंचायतवर आपला वरचष्मा ठेवला आहे. त्यांनी आतापर्यंत ग्राम पंचायत सदस्य, सरपंच, उपसरपंच, ही पदे उपभोगली आहेत. त्याचबरोबर ते 2010 मध्ये पंचायत समिती सभासद, 2015 मध्ये अमरावती कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक पदावर आपले काम शेतकऱ्यांच्या हितासाठी करीत आले आहेत.

तीस वर्षाआधीची पँथर मधील आक्रमकता कमी जरी झाली असेल पण आंबेडकरी चळवळ असो की इतर सामाजिक चळवळ त्यामध्ये आज सुद्धा इतरांना मदत व सहकार्य करण्याचा जोश आजही विनोद भाऊ भालेराव यांचा कायम आहे. ■ ■

## चेहरे

### अनंतायन



ॲड. अनंत खेळकर
मो. 9370061677

गुरूजी नेहमी म्हणायचे, 'जीवनाला जर मधासारखे गोड करायचे असेल तर, मधमाश्यांसारखे एकत्रीत राहावे. मग ती मैत्री, परिवार असो किंवा समाज. पण मी तुम्हाला जे सांगतो ते अंमलात आणणे एवढे सोपे नाही. कारण जेव्हा मोह अर्थात लालसा प्रमाणापेक्षा जास्त वाढते तेव्हा, वाईट गोष्टी दिसत नाहीत. अन् घृणा जर वाढली तर, चांगल्या गोष्टी दिसत नाहीत. मग एकी राहाणार तरी कशी? पण आयुष्यात प्रत्येकाला गुरू आणि काळ हे दोघेजण खूप काही शिकवत असतात. या दोघांच्याही शिक्षण पद्धती वेगवेगळ्या आहेत. गुरू तुम्हाला जे शिकवतात ते त्याचीच परीक्षा घेतात, काळ मात्र अगोदर परीक्षा घेतो, त्यानंतर शिकवतो. शिक्षण असो की जीवन दोन्हीतही प्रामाणिकता असायला हवी. शिक्षणामुळे वृद्धी होते ज्ञानात अन् प्रामाणिकतेने शांती लाभते जीवनात. प्रामाणिकता ही अशी गोष्ट आहे की, कुणी कितीही बेईमानीने संपत्ती कमावली तरी, त्या संपत्तीच्या रक्षणासाठी त्याला ईमानदार पहारेकरी हवा असतो. आयुष्यात आपल्या जवळच्या व्यक्ती बरेचदा एखाद्या संकटात सापडल्याने दुःखी होतात, तेव्हा त्यांना उपदेशाची नव्हे तर आधाराची गरज असते. सार्थक अन् प्रभावी उपदेश तो आहे जो वाणीतून नव्हे तर आचरणातून व्यक्त होतो. बरेचदा आपण जेव्हा एखाद्याला त्याची ख्यालीखुशाली विचारतो तेव्हा त्याच्या वेदना जरी दूर होत नसल्या तरी, कुणी ना कुणी आपली दखल घेणारा आहे, ही गोष्ट त्याच्या मनाला समाधान मिळवून देते. जीवनात खुपजणांशी नातेसंबंध नसले तरी चालतील, पण जेवढे नातेसंबंध आहेत त्यामध्ये जीवन असायला हवे. फार मित्र कमावून गमावण्यापेक्षा मोजके मित्र कमावून त्यांचे अखेरपर्यंत जतन करण्याला फार महत्त्व आहे. कुणासाठी काहीतरी करण्याची प्रामाणिक अशी आंतरिक तळमळ आणि स्वार्थरहीत जिव्हाळ्याच्या भरभक्कम पायावर उभी असणारी नात्याची इमारत खूप मजबूत असते. कधी कधी रक्ताच्या नात्यांपेक्षा जिवाभावाचे मित्र साथ देतात. रक्ताच्या नात्यांपेक्षा प्रेमाचे अन् मैत्रीचे नाते फार घट्ट असते. कारण यामध्ये सख्खा, चुलत, मावस, सावत्र असा कोणताही भेदभाव नसतो. तो जिवाशी असणारा जिवाचा संबंध असतो. आयुष्यात चांगले मित्र असणे आवश्यक आह. कारण, शरीराचा थकवा हा आराम केल्याने निघून जातो, पण मनाचा थकवा दूर करण्यासाठी आपल्याला आवडणाऱ्या मित्रांच्या सहवासासारखे दुसरे प्रभावी अन् परिणामकारक औषध नाही. आयुष्यात दुःख, चिंता या येणारच तरीही आपण इमानदारी सोडू नये, संपत्ती खूप कमवा पण साधासरळ व्यवहार ठेवा, मोठ्यात मोठ्या अधिकाराच्या पदावर असाल तरीही अंगी विनम्रता असावी. जो रागावर अन् बोलण्यावर नियंत्रण ठेवतो त्याला आयुष्याचे नियोजन चांगल्या पद्धतीने करता येते. आयुष्यात सहनशिलता फार महत्त्वाची आहे. आपल्याला हवे तसे दिवस पाहण्यासाठी बरेचदा नको ते सोसावे लागते. थोडक्यात काय तर आयुष्याचे गणित अचूकपणे सोडवता यायला हवे. नको त्या व्यक्तींचा गुणाकार करता करता हव्या त्या व्यक्तींचा भागाकार होत गेला तर सर्व गणित चुकत जाते. त्यासाठी माणसांची पारख करता आली पाहिजे. कारण आयुष्यात कधी कधी असासुद्धा अनुभव येतो. हालात बत्तर से भी बत्तर देखे, अपनों के हाथों में पत्थर देखे । जिन्हें समझते थे साधु-सज्जन हमने उनके भी चेहरे सत्तर देखे ।■ ■

बहुजन सौरभ

# जातनिहाय जनगणना जात नष्ट करेल काय ?

ब्राम्हण्यशाहीतील शूद्र आणि अतिशूद्र म्हणजे आजचे ओबीसी - बहुजन, भटके - विमूक्त, दलित ई. जातींची पाळेमुळे आणखी घट्ट करण्यासाठी हा निर्णय घेतला आहे आणि ते ही ओबीसी - बहुजन, भटके - विमूक्त दलित जातींना सामाजिक न्यायाचे गाजर दाखवून. तसेच जिसकी जितनी संख्या भारी उतनी उसकी भागीदारी या गोंडस फसव्या घोषणेखाली. जातनिहाय जनगणनेने जातीव्यवस्थेचे निर्मूलन होणार नाही, तर प्रत्येक जात अधिक बळकट आणि घट्ट होत जाईल. यावर अमानवीय आणि विकृत ब्राम्हण्यशाही पोसल्या जाईल.

**केंद्र सरकारने अचानकच तुघलकी फर्मान काढले. अगदी 'मनाच्या बाता' सारखे, आणि जातनिहाय जनगणना करण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय त्यांनी किती मनापासून घेतला? की षडयंत्रपूर्वक घेतला? तो किती चांगल्या भावनेतून घेतला? की दुष्ट हेतू मनात ठेवून घेतला? संविधानातील भारतीय नागरिक संबोधून देशहितार्थ घेतला? की मनुस्मृतीतील विषम, उच्च निच, सामाजीक विकृत व्यवस्थेला अधिक बळकटी प्राप्त करून देण्यासाठी घेतला? राजकीय फायद्यासाठी घेतला? की हिंदू शूद्र जातीय समाजव्यवस्था ब्राम्हण्यशाहीच्या सत्तावर्चस्वाच्या दावणीला बांधण्यासाठी घेतला? यावर माझे असे ठाम मत आहे.**

**जातनिहाय जनगणना कशासाठी? :-** मला असे वाटतेय की, जातनिहाय जनगणना ही निश्चितच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशहितासाठी बघितलेल्या 'जाती व्यवस्थेच्या निर्मूलनासाठी नाही'. तर ब्राम्हण निर्मित जातींना शासनाच्या विविध योजनांच्या तुटपुंज्या लाभावर भिकारी बनवून आणि त्यातच गुरफटून ठेवण्यासाठी घेतलेला हा निर्णय आहे. कारण आरएसएस, भाजपासह त्यांच्या अमानवीय, विकृत, रानटी झूंडींनी समाजात मनुस्मृतीतील उच्च निच अशी जात रचना अधिक बळकट करण्याच्या प्रयोगाला सुरूवात केली आहे. त्यासाठी ते देशाभिमानी महापुरुष छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती शाहू महाराज, महात्मा ज्योतीबा फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर ई. च्या पुतळ्यांची विटंबना करताहेत, हा त्याच एका कडीचा भाग आहे. त्यांचे पोस्टर्स फाडणे, त्यांच्या मानवीय आणि विवेकी विचारांची मोडतोड करणे, इतिहास खोटा, चुकीचा सांगणे, हा त्याच एका कडीचा भाग आहे. दलितांना बेदम मारहाण करून हत्या करणे, आया बहिणींचा अवमान करून अब्रू लुटणाऱ्या 'गाव शहरी दहशतवाद्यांना' हार तुरे घालणे, हा त्याच एका कडीचा भाग आहे. हिंदू शूद्रांना आणि दलितांना, तुझे शिक्षण घेणे काम नाही, तु आमची सेवा कर, असे म्हणणे या मनुस्मृतीपुरक विषम आणि विकृत समाजव्यवस्थेला अधिक बळकटी प्राप्त करून देण्याचे मनात ठेवूनच त्यांनी जातनिहाय जनगणना करण्याचा निर्णय घेतला आहे. हे त्यांच्या कथनी आणि करणीतून दिसून येतेय.

**जातनिहाय जनगणना संविधानातील भारतीय नागरिक विरोधी :-** जातनिहाय जनगणना हा उपक्रम संविधान विरोधी आहे. आपले संविधान या देशातील प्रत्येक भारतीय रहिवाश्याला भारतीय नागरिक संबोधतेय. संविधानानुसार सर्व भारतीय नागरिक समान आहेत. कोणी उच्च नाही कोणी निच नाही. कोणी पवित्र नाही कोणी अपवित्र नाही. कोणी श्रेष्ठ नाही कोणी कनिष्ठ नाही, स्त्री पुरूष असा भेद करीत नाही. सगळे एक समान. तर याउलट मनुस्मृती आहे. ब्राम्हणांनी त्यांच्या सर्वांगीण सत्ता वर्चस्वासाठी निर्मिलेल्या ज्या निच जाती आहेत, त्या समाजव्यवस्थेत तशाच टिकून रहाव्यात म्हणून, या तमाम हिंदू शूद्रांवर शाळबंदी, शिक्षणबंदी, नोकऱ्याबंदी, आरोग्याची हेळसांड असे निर्बंध लादून त्यांना कायम वंचित, बहिष्कृत, तिरस्कृत ठेवून ब्राम्हण श्रेष्ठत्व मिरवत आहेत. त्यासाठी प्रचंड महागाई वाढवून, विविध अघोरी जाचक कर लादून हिंदू शूद्रांना गरीब, लाचार, भिकारी, गुलाम बनवत आहेत. भारतीय संविधानानूसार ब्राम्हण श्रेष्ठ नाहीत. ब्रामहण देव देवी मंदिरातील पुरोहित नाहीत. ब्रामहण पवित्र नाहीत. ब्राम्हण श्रेष्ठ नाहीत. ब्राम्हण देव नाहीत. ब्राम्हण उच्च नाहीत, हे संविधानिक सत्य दुर्लक्षित करून ब्राम्हणी सत्तावर्चस्व अबाधित ठेवण्यासाठीच जातनिहाय जनगणना उपक्रम आखला आहे.



ॲड. सुभाष सावंगीकर
मो. 9325209492

**अस्पृश्यता मनुस्मृतीत :-** भारतीय संविधानात सर्वांच्या उत्थानाचा आणि कल्याणाचा मार्ग आहे. भारतीय संविधानात अस्पृश्यता नाही. तर ती मनुस्मृतीत आहे. भारतीय संविधानात शूद्रत्व नाही, तर ते मनुस्मृतीत आहे, ब्राम्हण्यशाहीत आहे. भारतीय संविधानातील अनुच्छेद 17 अन्वये अस्पृश्यता नष्ट करण्यात आली आहे आणि तिचे कोणत्याही स्वरूपातील आचरण निषिद्ध मानले गेले आहे. अस्पृश्यतेतून उद्भवणारी कोणतीही निःसमर्थता लादणे हा कायद्याने शिक्षापात्र अपराध ठरवला आहे. तर अनुच्छेद 15 अन्वये धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान या कारणांवरून भेदभाव करण्यास मनाई केली आहे. तरी सुद्धा ब्राम्हण्यवादी विविध जातीत बंदिस्त केलेल्या लोकांना संविधानिक मूल्यांवर त्यांचे लक्ष केंद्रित होऊ नये म्हणून धर्मांध, सांस्कृतिक, कर्मकांडीय, अंधश्रद्ध बळजबऱ्या लादत असतात. समाजव्यवस्था जातीविरहीत संविधानावर उभी राहूच नये, यासाठी धडपडता असतात आणि या जातीत बंदिस्त हिंदू शूद्रांना शासकीय कल्याणकारी योजनांचे तात्पुरते लाभार्थी गाजर दाखवून त्यासाठी जातनिहाय जनगणना करून त्यांना लाचार बनवून मनुस्मृतीतील विषमतेला बळकटी प्राप्त करून देत आहेत. हे खुप दुःखद आहे आणि याच षडयंत्रपूर्वक भावनेतून सरकार जातनिहाय जनगणना करण्याची घोषणा करतेय, हे तर त्याहून ही अधिक दुःखद आहे.





**सामाजिक समरसता नव्हे, सामाजिक समानता हवी :-** जातनिहाय जनगणना ही संविधानातील भारतीय नागरिक विरोधी आहे. भारतीय नागरिक या शब्दाला डावलून जातनिहाय जनगणना करणे म्हणजेच मनुस्मृतीपुरक समाजरचना उभी करणे. जातनिहाय जनगणना ही सामाजिक समरसतेची पुष्टी करते, तर सामाजिक समानतेला छेदते. जातनिहाय जनगणना समाजाची जातवार विभागणी करते. जाती पोटजातीची ओळख वाढवते. त्यांच्यात आपसात मन भेद आणि मत भेद वाढवते. जातीय तेढ दृढ करते. जाती पोट जातीत वितुष्ट, द्वेष, हिंसेला खतपाणी घालते.

स्वातंत्र्याच्या 77 वर्षात आणि संविधानाच्या 75 वर्षानंतरही देशातील सर्व भारतीय नागरिक हे नागरिक बनले नसून जातीच्या आधारे ओळख घट्ट बनविण्यात सरकार आणि त्यांचे सरकारी फॉर्म आजही अग्रेसर दिसतात.

मागच्या काही वर्षापासून ओबीसी नसलेले समाजघटक स्वतःच्या जातीचा ओबीसी वर्गवारीत समावेश कसा करून घेता येईल, असा प्रयत्न करीत आहेत. सामाजिक न्यायाच्या नावाखाली सरकारी योजना, सवलती, फायदे, आरक्षण ई. पदरात पाडून घेण्याच्या लालसेने जातनिहाय जनगणना करणे म्हणजेच व्यक्तीचा मान, सन्मान, प्रतिष्ठा, आदर, आभिमान, स्वाभिमान या सन्मानजनक बाबी दूर ढकलणे हे संतापजन आहे.

**केंद्र सरकारचे शपथपत्र :-** सप्टेंबर 2021 मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयात महाराष्ट्र सरकारने जनगणनेमधे मागासवर्गीय नागरिकांची माहिती गोळा करण्याची मागणी केली, त्यावर केंद्रातील मोदी सरकारने असे उत्तर दिले की, जातनिहाय जनगणना करणे शक्य नाही. मग आता ते शक्य का होत आहे? यामागील कोणता तो डाव आहे? तर एकीकडे मनुस्मृतीसह ब्राम्हण्यशाहीचे सत्ता वर्चस्व अबाधित ठेवणे आणि दुसरीकडे हिंदूंना विविध विषम जातीत बंदिस्त ठेवणे, या अर्थाने जातनिहाय जनगणना आपण समजून घेतली पाहीजे. जात माणसाची जातीच्या समुदायामधे विभाजन करते आणि त्या जात समुदायाची समाजव्यवस्थेत उच्च निच अशी रचना पण करते. या जातजाणिवा द्वेषमूलक आहेत. म्हणून जातीच्या पायावर समुदाय आणि देश उभा राहू शकत नाही. तर 'जातव्यवस्था ज्यावर उभी आहे, त्या धार्मिक, सांस्कृतिक कल्पनांचा विनाश करणे हाच जातीव्यवस्था उद्ध्वस्त करण्याचा मार्ग आहे'. जातनिहाय जनगणना नव्हे. ■ ■

# सहजीवनाची जीवनमूल्ये





*संत तुकारामांनी व्यक्तीगत जीवनाच्या शुद्धीकरणासाठी एक अतिशय उदात्त विचार मांडला आहे. ते म्हणतात, 'बैसोनी निवांत शुद्ध करी चित्त, तया सुखा अपरंपार नाही.' आपल्या पैकी प्रत्येकाच्या व्यक्तिगत जीवनाला तर हे सुत्र मार्गदर्शक आहेच. आपण अंतर्मुख होऊन आत्मनिरीक्षण करून आपल्या आत असलेल्या एकेका दोषाचे उच्चाटन केले असता आपल्या जीवनाचे शुद्धीकरण होते.*

मी सुद्धा सर्वांसारखी एक सामान्य स्त्री. जिचे जग संपूर्ण कुटुंबाभोवती फिरत असते. पण डोक्यात काही विचार येतात तेव्हा काहीतरी लिहावेसे वाटते. मग कधी कागदावर उमटते, कधी काव्यात तर कधी शब्दात. तसे पाहता संसारही एक तपच आहे. आपण आपले आयुष्य सर्वस्वी पणाला लावतो तो संसार सुखाचा करण्यासाठीच. नाही का? एकमेकांच्या सहवासानेच प्रेमही फुलते. जसे मुल गर्भात असते तेव्हापासूनच त्याला मायची उब मिळत असते. शरीर जरी वाढले तरी आईच्या मायेची मानसिक, प्रेमाची भुक कधीच भागत नाही आणि 'हे बंध रेशमाचे' हेच सर्वार्थाने सिद्ध होते. सहजीवन हे लग्नानंतरच खऱ्या अर्थाने सुरू होते. सांसारिक जबाबदाऱ्या पेलताना नाकी नऊ येतात. पण जर दोघांमध्ये चांगला समजूतदारपणा असेल तर मग सर्व अडचणींवर मात करू शकतो. एकमेकांची उनिदुनी न काढता एकमेकांच्या सुप्त गुणांना जर प्रोत्साहन दिले गेले तर संसार छान फुलतो. संसारात जीवन जगण्याचा मार्ग अगदी आखीव रेखीव असतो. स्वतःभोवती एक अदृश्य अशी लक्ष्मणरेखा तो आखून ठेवतो, बस्स या पलीकडे जायचे नाही, अशा सर्व गोष्टी जरी असल्या तरी मनुष्यात नैसर्गिक गुण जसे मानवता, खरेपणा, चांगुलपणा परोपकारी वृत्ती, थोड्या फार प्रमाणात शिल्लक आहेत. चांगले - वाईट, हार - जीत, यश - अपयश, मान - अपमान या सर्व गोष्टीतून अनुभव गाठीशी यायला लागतात. जसजसे अनुभवातून ज्ञान मिळत जाते तसतसे तुमचा अनुभव दांडगा होतो. हे सुद्धा जीवनाचे एक विद्यापीठच आहे. कालचक्र हे असे फिरतच असते. त्यातून मी काय मिळवले, यापेक्षा अनुभवाद्वारे मिळालेल्या चांगल्या गोष्टी, नवीन छंद, अवती-भोवतीच्या माणसातला चांगुलपणा आत्मसात करण्यातच धन्यता मानावी. विचाराने प्रगल्भ बनून जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोनही विशाल बनतो. सहजीवनाचा कटू गोड अनुभव घेत घेत कालच्या दिवसांपेक्षा आपण आज जास्त शहाणे होतो. जीवनातील कालचा दिवस हा काहींना काही तरी वेगळा अनुभव देऊन गेलेला असतो. आपण आपल्या माणसांवर मनापासून प्रेम करतो. ही स्त्रीयांची वृत्ती आहे. त्या शब्दांना आकार देतात, भावनांना वाट मोकळी करुन देतात, शब्दांनीच व्यक्तही होतात. याही पलीकडे शब्द थीटे पडले तर मुक वेदना आहेतच की सोबतीला. आपण आपल्यातच अलिप्तपणाच्या रेषा आखून ठेवायचा प्रयत्न करतो. पण मनाला मात्र बांधता येत नाही. त्यांचे वेडे मन धावतच असते. आपुलकीच्या, जिव्हाळ्याच्या शब्दाचे भुकेले असते ते. कधी कधी एका वळणावर आपण स्थिरावण्याचा प्रयत्न करत असताना मागचे वळण फारच नजरेआड झालेले भासते. त्याच्या खुणाच पुसून जाव्या इतपरते अस्पष्ट होऊ लागते. पटकन वाळू हातातुन निसटुन जावी असेच काहीसे आयुष्याचे झाले आहे असे वाटते. स्त्रीयांचे आयुष्य नदीच्या प्रवाहा सारखे आहे. नदीचे स्त्री सुलभ रूप नक्कीच विलोभनीय भासते. पण स्त्रीच्या सहचराला नेहमीच वाटते की तू माझ्या विचारांशिवाय काहीच करू शकत नाही, तुला स्वतःचे असे अस्तित्व आहे का, आणि या त्याच्या विचाराने तिचा कोंडमारा होतो. तिही मग मीही माणूस आहे, मी हार पत्करणार नाही, हार मानणार नाही, असे चित्रच नको सहजीवनात. सुंदर, मनमोहक, आशावादी, जे सर्वांना पाहताच क्षणी आवडेल असे असावे. आपल्या कर्तृत्वाने चांगुलपणाने आपण आपल्या सहजीवनात, संसारात स्वर्ग निर्माण करू शकतो, पण हे करण्यासाठी दोघांकडेही आभाळाएवढे मोठे मन, हृदय लागते आणि ते सर्वांचे असतेच असे नाही. ■ ■



मंदाकिनी काकडे,
मो. 86000 17963

# नागवंशी शाक्य, पिंपळवनाचे मोरीय व मगधचे मौर्य बौद्ध होते...





*कपिलवस्तूचे शाक्यवंशी व पिंपळवनाचे मौर्यवंशी आणि नागभूमी (महाराष्ट्र) चे महार नागवंशी यांच्यात निकटचा संबंध आहे. कपिलवस्तूचे शाक्य सिंह हनुनाग व माता कच्चायनाचे पुत्र राजा शुद्धोधन होते आणि त्यांचा पुत्र सिद्धार्थ गौतम पुढे बुद्ध झाला.*

हरयंक (अरियंक) नागवंशी मगध नरेश बिंबिसार उदयभद्दनाग यांचा पुत्र होता. उदयभद्द हडप्पाचे हरपाल राजा (हरपुरिया) चे वंशज होते. ओक्काक (इतवाक) नागवंशी राजा ई.पू. 600 भौरनाग पुत्र महाकौशल पुत्र श्रावस्ती नरेश प्रसन्नजीत बुद्धाच्या समकालीन कट्टर समर्थक बुद्धाचे उपासक होते. पुढे श्रावस्ती नरेश प्रसन्नजीत नि कपिलवस्तू च्या शाक्य कुळाशी वैवाहिक संबंध जोडण्याची इच्छा व्यक्त केली, तेव्हा कपिलवस्तूचे महानाम शाक्य आपल्या नागमुंडा दासी पुत्री 'वासमखत्तीया'शी प्रसेनजीत राजा सोबत विवाह करून सौपविले. तिच्या पासून कुमार विदुदभचा जन्म झाला. कोसल नरेश प्रसेनजीत नि युवराज विदुदभाला सेनापती नियुक्त केले आणि तो कपिलवस्तूला मातेच्या माहेर घरी निघाला. तिथे विश्रामगृहात त्याची सेवा सुश्रूषा झाली. वापस परततांना त्याच्या अंगरक्षकाचे खडक विश्रामगृहात विसरून राहिले होते. ते घेण्यासाठी अंगरक्षक आला, त्याने बघितले त्या विश्रामगृहाची खूप साफसफाई होत होती. त्याने सफाईकर्मीला विचारले, त्याला उत्तर मिळाले कि युवराज विदुदभ दासी पुत्रीचा पुत्र आहे, म्हणून ही साफसफाई होत आहे. अंगरक्षक वापसी येतांना विदुदभाला हे दृश्य वृत्तांत सांगितले. विदुदभ क्रोधित होऊन म्हणाला, 'कपिलवस्तूच्या शाक्यांना या अपमानाचा बदला चुकवावा लागेल'. हे कपिलवस्तूच्या शाक्यांना कळले आणि ते विस्थापित होऊ लागले. पुत्र विदुदभच्या राज क्रोधाग्निमुळे शाक्य जनपदावर आक्रमणाला घाबरून एक शाक्य वंशी घटक पिंपळवनाच्या मोरिया राज्यात येऊन मगध साम्राज्यात सुरक्षित झाले. दुसरा शाक्य वंशी घटक सिंध प्रांत पाकिस्तानच्या हैदराबाद निकट 'पातालपुरीत' स्थापित झाले. शाक्य कुल साकिया वृक्षावरून आहे. हिमालय तराईत हे साकिया वृक्ष आढळतात. जे कुळ भूमी, प्राणी, नदी, पर्वत, वृक्ष व प्राकृतिक ग्रह ताऱ्यांच्या नावावरून असतात, अर्थात ते नागलोकांचे कुळ असते. बुद्धाचे नाव सिद्धार्थ गौतम बुद्ध अर्थात आईचे नाव 'गौतमी' नावात शोभित आहे. यावरून सिद्ध होते कि शाक्य कुळ नागवंशी खत्तीय आहे.बुद्धाच्या महापरिनिर्वाणा नंतर ई.पू. 483 मध्ये कुशीनारा (मल्ल) देशात सर्व आठ गणराज्याचे गण प्रमुख आले होते. ई.स. 1898 मधे सर डब्ल्यू.सी. पेपेनी सिद्धार्थ नगर उ.प्र. च्या ग्राम पिपरवहाचे पुरा. उत्खनन केले. त्यात 10 फुट गहराईत पाषाण करंडक व त्यात पांच अस्थी कलश मंजुषा व मुल्यवान माणिक मोती मिळाले. करंडक संदुकावर 37 पाली प्राकृत भाषा अक्षरांचा शिलालेख उत्कीर्ण आहे, 'येन ईय सलिल निधनेन बुद्धस्य भगवंत साकीय सुकीती भातीनस्स भगिनी कनस पुत्त दलन' उत्कीर्ण आहे, अर्थात हे बुद्ध महापरिनिर्वाण उपरांतच्या अस्थी धातू आहेत, ज्यावर निर्मित स्तूप सुकीर्ती शाक्यने आपल्या बंधू भगिनी व नातू पंतुच्या पुण्य स्मरणार्थ बनविला आहे. ब्रिटिश सरकारनी 1899 ला काही भाग थाई सम्राट राम (पंचम), काही भाग बर्मा सम्राट (पिशाम) व काही भाग सिलोन सम्राटाला सम्मानपूर्वक भेट केल्या. काही भाग ई.स. 1920 मध्ये चेन्नई म्यूजियम व काही भाग कलकत्ता संग्रहालयात सम्मानपूर्वक सुरक्षित केला आहे. सेनापती विदुदभच्या सैन्य शक्ति बळाला घाबरून मगधचा युवराज अजातशत्रू आपले सैन्य बळ चुस्त दुरुस्त करायला लागला. त्याने रथमुसलअग्निकंटक शस्त्र निर्मित केले आणि कौसलचे काही क्षेत्र हडपले. विदुदभाच्या कपिलवस्तू वर आक्रमण आणि शाक्यांचे पलायन, या कारणाने अजातशत्रू व विदुदभ यांच्यात वैर निर्माण झाले. कारण विदुदभ नागमुंडा व महानाम शाक्य पुत्री वासम खत्तीया चा पुत्र होता. त्याला जन्म उत्पत्तीमुळे निम्न श्रेणीचा समझत होते. अजातशत्रू, विदुदभ यांच्यात महासंग्राम आरंभ झाला. तेंव्हा बुद्धांनी गृध्रकूट पर्वतावर दोन्ही राजकुमाराचे वैर शांत केले आणि पूर्व पीढीचा रिश्ता सांगून उपदेश दिला कि, 'युद्ध जिंकणाऱ्या विजेत्याने हारणाऱ्याचा सम्मान व रक्षा करावी'. तेंव्हा विदुदभ (विजयस) ला विजेता सम्मान प्राप्त झाला आणि स्वतःची बहीण वजीराचा हाथ अजातशत्रूला देऊन पूर्व पिढीचा रिश्ता कायम केला. याच कालखंडात अजातशत्रूच्या राज क्रोधाला घाबरून मगध चे छत्तीस राजकुल दक्षिणेत छत्तीसगढ, महाकांतार (महाराष्ट्र), अपरांतच्या (नागभूमी) देशात येऊन स्थानिक झाले, तेंव्हा महाकौशल क्षेत्राचा संपूर्ण दक्षिणी भाग विदुदभाला देण्यात आला. यावरूनच नागभूमीचे नाव विदर्भ म्हणून प्रसिद्ध झाले. सर जॉन मार्शलनी तक्षशिला रावलपिंडी पाकिस्तानच्या धम्मराजिक स्तूप उत्खनन करतांना तक्खसिला उत्कीर्ण शिलालेख व बुद्ध दंत धातू मंजुषा प्राप्त झाली. तत्कालीन व्हॉइस राय नी दि. 03/02/1917 ला प्राप्त दंत धातू सिलोनच्या कँडी शहरच्या मालीग्रीवा बुद्ध विहारात श्रद्धापूर्वक प्रदर्शनार्थ ठेवला आहे. ई.स. 1920 ला कलकत्ता दरबार हॉलमध्ये समारंभ घेऊन बर्मा नरेश पिशामला भेट दिल्या. इतिहासकार त्यांना मौर्य वंशी लिहतात, कारण सम्राट अशोकाचे दादा चंद्रगुप्त मौर्य पिंपळवनाचे अधिपती सरावत्थ सिद्ध चंद्रवर्धन हैवज्र मौर्य होते. ते कपिलवस्तू वरून आलेल्या शाक्य लोकांचे वंशज होते. ई.पू. 480 ला महाकांतार (महाराष्ट्र) नागरधन चा राजा महरनाग पुत्र अंबतिठ्ठक बुद्धाच्या अस्थी ग्रहण करण्या करिता उशिराच पोहचला होता. त्यांनी पिंपळवनाच्या शाक्य राजांशी संपर्क करून बुद्धाचा दंत धातू व काही रक्षा धातू मिळवल्या. त्या दंत धातू वर 'पवनी'चा स्तूप निर्मित आहे. एक विशाल स्तूप गोंदिया बालाघाटच्या सरहदी जंगलात आहे. पुरा. उत्खनन आवश्यक आहे.



धम्मपाल देशभ्रतार
मो. 9131422581

चंद्रपूर जिल्हा देवटेकजवळ चिकमारा (चिकम्बरा) गावातील चिंचीच्या झाडाखाली सम्राट अशोकाचा शिलालेखात उत्कीर्ण आहे कि, 'महाकांतार अपरांत महारट्ठ रट्ठ भोज पैतनिक रखंती धम्माचरनेन अति ऊत्तमं' अर्थात महारट्ठ व अपरांत देशाच्या रट्ठ (महार), भोज (यादव), पैतनिक (पैत्रिक) मूलनिवासी लोकात धम्म आचरण अति उत्तम आहे. सध्या हा शिलालेख अजब बंगला संग्रहालय नागपूर इथे सुरक्षित आहे. हा लेख 1944 म्यानमार (मांडले) च्या प्रकाशन सभेत जाहीर झाला. त्यानुसार सम्राट अशोकाचा जन्म दिवस चैत्र शुक्ल अष्टमी पडतो. हा दिवस अखंड जंबुद्वीप दिवस म्हणून साजरा केला जातो. ■ ■

